गुरूवार, २८ मार्च २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २१४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 28 MARCH 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-214 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# आज महाराष्ट्रातील महाकवींच्या भन्नाट कविता ऐकण्यासाठी जरूर या !

महाराष्ट्राचा महाकवी 2024

## पुरस्कार वितरण कविसंमेलन

आधुनिक केसरी विश्वव्यापी मराठी दैनिक

AEONPLAY



**शुभहस्ते**

मा. श्री. इंद्रजीत भालेराव
(सुप्रसिद्ध कवी)



**उद्घाटक**

मा. श्री. वसंत मुंडे
(प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई )



**प्रमुख उपस्थिती**

मा. श्री. डॉ. अतुल नाईक
(डायरेक्टर एऑन प्ले)



**विजेते**

मा. श्री. नामदेव तुकाराम चोथे



**कविसंमेलनाच्या अध्यक्षा**

मा. डॉ. सौ. संजीवनी तडेगावकर
(प्रसिद्ध कवयित्री)


**कधी**

गुरूवार दि. 28 मार्च 2024
सायंकाळी 4 वाजता

**कुठे**

कुलस्वामिनी मंगल कार्यालय, सिडको एन-8, आझाद चौकाजवळ, छत्रपती संभाजीनगर

**कविसंमेलनात सहभाग**



प्रा. विजय पोहनेरकर



विनोद जैतमहाल




कस्तुरी कुलकर्णी



प्रशांत मुळे

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

जीवन हे इंद्रधनुष्यातील सप्तरंगांप्रमाणे मोहक आणि सुंदर आहे. जीवनात संगीत, नृत्य आणि रंगांचा आनंद घ्या हेच जणू श्रीकृष्णांनी आपल्या या कृतीतून सांगितले. आपले जीवन रंगांनी, संगीताने समृद्ध व्हावे, आळस, सुस्तपणा यांचा त्याग करावा आणि उत्साहाने भरलेले रसरशीत जीवन जगावे हाच यानिमित्ताने त्यांचा आणि होळी या सणाचा संदेश आहे. त्याचबरोबर आपले पर्यावरण जपण्याचा संदेश देणारा पण हा सण आहे. आजच्या काळात आपल्याला होळीचा असाही अर्थ घेता येईल. समाजातील जातीभेद, उच्चनीचता, वाईट चालीरीती, प्रथा यांचा त्याग आपण करावा असाही संदेश हा सण नकळतपणे आपल्याला देतो. केशवसुतांच्या शब्दांत सांगायचे तर –**जुने जाऊ द्या मरणालागुनी**
**जाळून किंवा पुरुनी टाका**
**सडत न एक्या ठायी ठाका**
**सावध ! ऐका पुढल्या हाका.**
हाच खरा या सणामागील अर्थ आहे.

खरी होळी साजरी केली ती आपल्या देशभक्तांनी आणि क्रांतिकारकांनी. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वदेशीचा पुरस्कार आणि परदेशी वस्तूंवर बहिष्कार असा नारा लोकमान्य टिळक, महात्मा गांधींनी दिला आणि विदेशी कपड्यांची, वस्तूंची होळी करण्यात आली. अनेक देशभक्त आपल्या घरादाराची, आयुष्याची होळी करून देशासाठी हसत हसत फासावर चढले. आपणही त्यांच्या या त्यागाची जाणीव ठेवू या. आणि त्यांनी जे स्वातंत्र्य आपणास मिळवून दिले आहे ते जपण्यासाठी ज्या ज्या काही वाईट गोष्टी त्याच्या आड येत असतील अशा सर्व गोष्टींची होळी करून त्यांना श्रद्धांजली वाहू या.

आणि सर्वात शेवटी सांगायचे तर ' श्याम पिया मोरी रंग दे चुनरिया ' असे म्हणत त्या श्यामसुंदराला आवाहन करावे कारण ' रंगात रंग तो श्यामरंग ' हेच खरे !






## आनंदी पहाट

# अंतर्मनाच्या मुलभूत गरजा ह्या व्यक्त होण्यातून पूर्ण होतात

आधुनिक केसरी

अनेकांकडून केवळ शरीरासाठीच सर्वकाही केले जात असते. परंतू आपल्या मनाचा, मनातल्या मनात, मनमुरादपणे किंवा मनमारून, मनपसंद असा कधी विचार देखील केला जात नाही. मनंच आपल्याला जगायला शिकवत असते, मनंच आपल्याला पदोपदी अनेकविध निरनिराळ्या प्रसंगांची अनुभूती देत असते. दुसऱ्याच्याच काय पण आपल्या स्वतःच्या मनाचा सुद्धा थांग पत्ता लागणे मुश्कील असते. आपल्यापैकी प्रत्येकजण दिवसाची रात्र, रात्रीचा दिवस करून दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी धडपडत असतो. सद्यःस्थितीत आपल्या मुलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी सर्वप्रथम अर्थार्जन अनिवार्य झाले आहे. तसे बघितले तर अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीनही मुलभूत गरजांची पूर्तता शरीरासाठीच होत असते. पण मनाचे काय? ते दिसत नसले तरीही असतेच. आपल्या जगण्यापलीकडच्या जीवनाला मनामुळे आपले आयुष्य वेगळे असल्याची प्रचीती येत असते. आपल्या शरीरावर ताबा ठेवून त्याला आपण स्थिर करू शकतो, पण मनावर नियंत्रण ठेवणे मोठे कठीण काम असते. काहीजणांमध्ये स्वमग्नतेचे प्रमाण अलीकडच्या काळांत अधिक दिसून येत आहे. ह्याचा निश्चितच थेट संबंध आपल्या अंतर्मनाशी असतो. मनाचा विचार न करता केवळ कोणत्यातरी अनावश्यक बाबींचा अनावधानाने विचार करणे ह्यामध्ये सुरु होत असते. काही प्रमाणांत अशी व्यक्ती आत्मकेंद्रित झाल्याचा आपल्याला प्रत्यय येऊ लागतो. अशा व्यक्तींच्या अंतर्मनांत सुरु असलेल्या वैचारिक प्रक्रियेत अनाठायी विचारांचा कल्लोळ माजलेला असतो. त्यांच्या शरीर आणि मन ह्याचा मिलाफ होणे शक्य होत नाही. अनेकदा ह्या स्वमग्नतेमुळे स्वतःच्या अस्तित्वाची देखील जाणीव रहात नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### स्थितप्रज्ञ कौल | देत आहे ||

येते ही कुणाची | ऐल तीरी साद ||
अनाहत नाद | कानी गुंजे ||१||
पैल तीरी कान्हा | वाजवी बासरी ||
भैरवी अंतरी | व्याकुळली ||२||
डोकावले मन | सांजावल्या डोही ||
तेजाळली देही | सांजवात ||३||
मौनाच्या कानात | बोलला अभंग ||
हृदयी श्रीरंग | स्थिरावला ||४||
आता कैसा तीर | ना ऐल ना पैल ||
स्थितप्रज्ञ कौल | देत आहे ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज



पुष्प 27 वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**


### सामूहिक सेवा

अन्नब्रह्माचे  निर्माण करणारी सर्वांची भुक तहान भागविणारी शाकंबरी महालक्ष्मी म्हणजेच माता भगवती या राष्ट्राच्या प्राथमिक गरजा पूर्ण करणारी आहे.पंचमहाभूतांचे संतुलन करणारी,दारिद्र्य दूर करणारी, राष्ट्राला स्वावलंबी व समृद्ध बनवणारी आहे. ती मानवाच्या सदभावनेने संतुष्ट होऊन दुष्काळाचा सुकाळ करते. ती मानवाच्या उन्नत अनाचाराने  क्रोधित होऊन त्याला दिन, हतबल बनवून दंड देते.  प्रमत्तास दंड व भक्तास न्याय हे परमेश्वरी ब्रीद आहे. अशा निसर्ग  प्रकोपापुढे विज्ञानही मौन होते. या सर्वांचा सखोल विचार करून मानवाच्या मनातील स्वार्थ,अनाचाराला आळा घालण्यासाठी,विवेक सुदृढ करण्यासाठी भगवतीची उपासना आवश्यक आहे. सप्तशतीच्या  पाठांमधून मनावर होणारे संस्कार, मिळणाऱ्या प्रेरणा,जागृत आत्मशक्ती,व्यक्तिमत्व प्रगल्भ,सतेज, धैर्यवान,संयमी बनवते. लहानपणापासून अशा व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होणं हितकारक आहे. सप्तशतीचे महत्त्व ध्यानीमनी रुजले पाहिजे,तो व्यक्तिमत्त्वाचा गुण बनला पाहिजे,  सप्तशती कर्तव्यात सामावली गेली पाहिजे. या दृष्टीने घर,केंद्र,शाळा या ठिकाणी सप्तशतीच्या  सामूहिक पाठातून हा संस्कार रुजवण्याचा प्रयत्न व्हायला हवा. महादेवीची महाभगवतीची स्तुती सर्व देवतांनी संकट समयी,वेळोवेळी केली आहे.या महाभगवतीला तथागत गौतमाने प्रज्ञापारमिता शक्ती म्हटले आहे.  करुणावत्सल जगत जननीची सेवा दुःख, व्याधी, जरा, मृत्यू यांचा विनाश करणारी आहे.मानवाला ब्रह्मांडाच्या सर्व शक्ती लाभल्या आहेत. या शक्तींचे कल्याणकारी रूप  अवगत होण्यासाठी सप्तशतीच्या रूपाने सेवा रुजू करणे गरजेचे आहे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र.  ९९२२४२००३४**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**जाग्रित और सुषोप्ति के,**
**स्वप्न मध्य महँ होय ।**
**संस्कार दुख सुख वने, मन अभास भय**
**सोय ।।२८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/२८ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : जागृत आणि सुषुप्तिच्या मध्ये स्वप्न अवस्था असते, ज्यावेळी संस्कार सुख-दुःखाचा भास मनात होतो.  मन बाह्य विषयांना सोडून आपल्या संस्कारांनुसार सुख-दुःखाचा अनुभव, स्वप्न अवस्थेत करते.**




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# नाम सद्गुरूकडून घेणे श्रेयस्कर !

आधुनिक केसरी

नाम सद्गुरूकडून घेणे जरूर आहे, की ते आपणच आपल्या आवडीप्रमाणे घेतले तरी चालेल ? वास्तविक भगवंताचे नाम स्वतःसिद्ध आहे आणि परिपूर्ण आहे; त्याला दुसऱ्या कुठून पूर्णता प्राप्त करून घ्यायची असते असे नाही. म्हणून, सद्गुरूकडून घेतलेले नाम आणि आपण स्वतःच्या पसंतीने घेतलेले नाम ह्यांत फरक करता येत नाही. तरीसुद्धा, सद्गुरूकडून घेतलेल्या नामाचे वैशिष्ट्य आहेच. ते असे की, तो त्या नामाच्या पाठीशी सत्तारूपाने असतो, आणि आपल्याकडून नामस्मरण होण्यात त्याची आपल्याला फार मदत होते. त्यामुळे, आपल्या हातून होत असलेले नामस्मरण त्याच्या सत्तेनेच होत आहे ही जाणीव राहून, ' मी नामस्मरण करतो ' अशा तऱ्हेचा अहंकार उत्पन्न व्हायला वावच राहात नाही. सद्गुरूच्या आज्ञेचे पालन करता करता साधकाला नामाची गोडी लागते, आणि नाम पोटभर घेतल्याने त्याचा आत्मा तृप्त होतो. म्हणून सद्गुरूकडून नाम घेणे जरूर आहे. सद्गुरुभेट होईपर्यंत मात्र आपण आपल्याकडून नामस्मरण करीत



राहणे आवश्यक आहे, कारण ते नामस्मरणच आपल्याला सद्गुरूची भेट करवून देईल. तसे पाहता, आधी संताची भेट होणे कठीण; आणि समजा भेट झाली, तरी त्याच्यावर विश्वास बसणे त्याहून कठीण असते. म्हणून नामाचे साधन चालू ठेवावे. खडीसाखर ठेवली म्हणजे मुंगळ्यांना आमंत्रण करावे लागत नाही, ते आपोआप तिचा शोध काढीत येतात. तसे तुम्ही खडीसाखर बना म्हणजे संत तुमच्याकडे धावतच येतील. ' खडीसाखर बना' म्हणजे संतांना आवडेल असे वर्तन करा. संतांना काय आवडते ? भगवंताचे अनुसंधान आणि अखंड नामस्मरण, याशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट त्यांना प्रिय नाही. म्हणून आपल्या हृदयामध्ये नामाची ज्योत अखंड तेवत ठेवा. सद्गुरू तुमचा शोध घेत येतील आणि तुमच्यावर कृपेचा वर्षाव करतील.आता अशा रीतीने सद्गुरूने नाम दिल्यावर एखाद्याला असे वाटेल की, '' मी ' राम, राम ' असे म्हणत होतोच, आणि आता सद्गुरूने तेच सांगितले; तर मग यात काय मोठे झाले ? '' पण यातच विशेष आहे, कारण यात ' मी कर्ता ' हा अभिमान टाकावा लागतो. सद्गुरूकडून नाम घेतले म्हणजे आपल्या कर्तेपणाच्या अभिमानाला वाव रहात नाही. मिठाचा एकच खडा खीर नासवायला पुरेसा होतो, त्याप्रमाणे अभिमान हा सर्व साधन नासवायला कारणीभूत होतो. म्हणून अभिमान टाकणे ही गोष्ट फार महत्त्वाची ठरते. भगवंताचे नाम हे औषध समजावे; भगवंताची प्राप्ती हे त्याचे फळ; जरूर तेवढेच करणे, म्हणजे सांगितलेले तेवढेच करणे, जास्त न करणे, हे त्याचे अनुपान समजावे. औषध मात्र थेंबथेंब आणि सतत पोटात गेले पाहिजे.

## मायाब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

काही दहा ओळीत लिहून संपणारं निरूपण नाही. मी तर म्हणेन की आता जेवढं वाचन करता करता ते अधिकाधिक मी त्यात गुंतत चालेलेआहे. थोडक्यात सांगायचे तर जसजसं लिहिते आहे. तसतसे अजूनही काही बाकी आहे असं वाटतं आहे. यालाचं तर "भगवंत् भक्तिची भुक म्हणतात का?" असो तर आपण पुढचा समासाचा अभ्यास करूया.

शुदध् निर्गुण व निर्मळ परब्रम्हामध्ये अक्षरशः अनंत शक्ति वास करतात. त्यापैकी द्रुष्य किंवा नामरूपे किंवा आकार निर्माण करणारी एक अति विलक्षण शक्ति आहे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, २८ मार्च २०२४
adhunikkesari.com

# हा प्रामाणिक कार्यकर्त्याचा विजय, संपत जाधव यांची लोकसभा संयोजकपदी नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश ठाकूर**

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय जनता पार्टी- भटके व विमुक्तआघाडीचे (व्हीजेएनटी) लोकसभा संयोजक संपत जाधव यांची पक्षाने छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदार संघाच्या पदावर नियुक्ती केली आहे. अबकी बार चारसौ पार' असा नारा देत भारतीय जनता पार्टीने आगामी लोकसभा निवडणुकीची जोरदार तयारी केली आहे. या अनुषंगाने पक्षाने विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांवर लोकसभा मतदार संघांमध्ये मोठी जबाबदारी दिली आहे. भारतीय जनता पार्टी- भटके व विमुक्त आघाडीचे (व्हीजेएनटी) लोकसभा संयोजक संपत जाधव यांची पक्षाने छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदार संघाच्या प्रभारी संयोजक पदावर नियुक्ती केली आहे. राजकारणात काम करत असताना कार्यकर्त्यांना न्याय देणारा एकमेव पक्ष हा भारतीय जनता पार्टी आहे. आपण पक्ष कार्य करत राहिल्यास पक्ष आपल्या कामाची दखल घेत असतो. मागील काही वर्षांपासून भारतीय जनता पार्टी मध्ये कामगार मोर्चा मंडळ अध्यक्ष ते भारतीय जनता पार्टी भटक्या विमुक्त {VJNT} आघाडी चे लोकसभा संयोजक हा प्रवास खडतर असून पक्षाने व पक्षातील {VJNT} महाराष्ट्र प्रदेश अद्यक्ष



राहुलजी केंद्रे व याचा हा विश्वास एक सामान्य गोर गरीब होतकरू कुटुंबातील सदस्यावर एवढी मोठी जबाबदारी सोपविली म्हणजेच हा एक प्रामाणिक कार्यकर्त्याचा विजय..! हा विजय नक्कीच म्हणता येईल परंतु मी "संपत जाधव " ग्वाही देतो कि,मी संपूर्ण तण मन बुद्धीने प्रामाणिक पने महायुती जो उमेदवार ठरविलं त्या उमेदवाराला निवडून आणण्याचं प्रयत्न करेल ती एक म्हण ते म्हणतात ना प्रयत्न अंती परमेश्वर ..! मतदार संघात महायुतीच्या उमेदवाराला मोठी आघाडी मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला जाईल असं संपत जाधव यांनी म्हटलं आहे. या नियुक्तीबद्दल भाजपा पक्षातील सहकाऱ्यांनी संपत जाधव यांचं अभिनंदन केलं आहे....! पक्षाने आपल्यावर सोपविलेल्या जबाबदारीला पूर्ण न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल ..!



# पुरातन रांजणात पाणी टाकून नाथषष्ठी सोहळ्यास सुरूवात

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** फाल्गुन कृष्ण द्वितीयेला तुकाराम महाराज बिजेपासून नाथांच्या षष्टी सोहळा उत्सव सुरू होतो. मग या दिवशी नाथ वंशज राजंणाची पूजाकरून पैठणातील ब्रम्हवृंद,नाथवंशज, नाथांवर श्रद्धा असणारे देशातील कानाकोपऱ्यातून आलेले सर्व यात सामील होतात तुकाराम बीजेच्या दिवशी नाथ वंशजातील सुवासिनी स्त्री पहिल्यांदा त्या रांजणात पाणी भरते आणि पुढे हा रांजण भरण्याचा कार्यक्रम चालू होतो. कधी पहिल्या दिवशी तर कधी चौथ्या दिवशी हा श्रीखंड्या ने पाणी भरलेला राजंन भरतो. हा भरलेला ओळखायचा कसा तर तिथे उत्सवा दरम्यान एका व्यक्तीची खास नेमणूक याच कामासाठी केलेली असते जेव्हा रांजण भरतो तेव्हा पाण्याला प्रचंड उसळी येऊन पाणी बाहेर पर्यंत उडते तेव्हा तिथे खास नेमणूक असल्याने मोठ्यांदा गजर करायचा "देवाचा रांजण भरला हो.."तेव्हा हजारो माणसं दर्शन घेत असतात. बुधवार दि,२७ रोजी दुपारी नाथ वंशज रघुनाथ महाराज पालखीवाले यांच्या हस्ते नांथाच्या वाड्यातील राजंनाची विधीवत पुजा करुन मानाची पहीली घागर उल्काताई रघुनाथ पालखीवाले यांच्या हस्ते रांजनात गोदावरीचे शुध्द जल टाकण्यात आले. या पुजेचे पौराहित्य वे.शा.सं चंदशेखर उपाध्ये, रवींद्रगुरु साळजोशी, उत्तमगुरु सेवनकर, पोपट गुरु, प्रकाश नाईक यांनी केले. यावेळी ज्ञानेश महाराज पालखीवाले, योगेश महाराज पालखीवाले, रविंद्र पांडव,एश्वर्या पालखीवाले, अपूर्वा पालखीवाले, माधुरीताई पांडव, अथर्व पांडव, रेखाताई कुलकर्णी, श्रीकृष्ण कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# मी अश्रू किंवा सहानुभूतीच्या जोरावर मत मागत नाही

## आ. प्रतिभा धानोरकर यांचे मुनगंटीवार यांना सडेतोड उत्तर



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर : 2019 मध्ये जो संघर्ष माझे दिवंगत पती सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांना आला तोच संघर्ष या वर्षी माझ्याही वाट्याला आला. ज्याच्यामध्ये संघर्ष करण्याची क्षमता असते त्याच्याच वाट्याला संघर्ष येतो. परंतु असे असतानाही काँग्रेसच्या सर्वेसर्वा सोनिया गांधी आणि राहुल गांधी या माझ्यासोबत होत्या त्यामुळे मला माझी उमेदवारी मिळालेली आहे. उमेदवारी मिळाल्यामुळे आपण पहिला गड जिंकलो आहे . परंतु आता दुसरा गड जिंकायचा आहे . त्यासाठी मी तुमच्याकडे मी केलेल्या कामाच्या बळावर तुम्हाला मत मागायला आली आहे . मी अश्रू किंवा सहानुभूतीच्य जोरावर तुम्हाला मत मागत नाही तर मागील साडेचार वर्षाच्या काळात आमदार म्हणून मी जे काम केलं त्या कामाच्या जोरावर आणि दिवंगत पती बाळू धानोरकर यांचे लोकसभेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी तुम्हाला मत मागत आहे. चंद्रपूरचा आराध्य दैवत असलेल्या माता महाकालीचा आशीर्वाद घेऊन मी या लढाईला समोर जात आहे . त्यामुळे विजय निश्चित आहे, असे मत इंडिया आघाडीच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर यांनी भव्य शक्ती प्रदर्शनाच्या रॅलीनंतर आयोजित जाहीर सभेत व्यक्त केले .**

यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री शिवाजीराव मोघे, चंद्रपूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष आमदार सुभाष धोटे, शहराध्यक्ष रितेश तिवारी, विनोद दत्तात्रय, ओबीसी नेते बबनराव तायवाडे, आमदार सुधाकर अडबाले, बाबासाहेब वासाडे, वामनराव कासावार, निंदेकर यांच्यासह इंडिया आघाडीच्या घटक पक्षातील सर्व पदाधिकारी काँग्रेसचे माजी आजी आमदार, मंत्री आदींची उपस्थिती होती. सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांच्या जाहीर सभेमध्ये कुणालाही अश्रूंच्या बळावर किंवा सहानुभूतीवर मतदान करू नका नाहीतर पुढील साडे चार वर्ष तुमच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहणार नाही असे आवाहन नागरिकांना केले होते. मुनगंटीवार यांच्या वक्तव्यावर प्रतिभा धानोरकर यांनी सडेतोड उत्तर देत मी रडणारी नव्हे तर लढणारी स्त्री आहे. मी अश्रू किंवा सहानुभूतीच्या जोरावर मत मागत नाही तर मी केलेल्या कामाच्या बळावर मी लोकांसमोर मत मागायला जात आहे, असे सडेतोड उत्तर त्यांनी यावेळी दिले. जबरदस्तीने नवरदेव म्हणून बोहल्यावर उभे केले तर तो संसार जास्त काळ टिकत नाही. तस इच्छा नसतांना मुनगंटीवार यांना जबरदस्तीने उमेदवारी दिली असल्याने त्याचीही हालत जबरदस्तीच्या नवरदेवसारखी झाली आहे. उमेदवारी अर्ज भरायला गेलो तेव्हाच विरोधी पक्षाच्या उमेदवाराच्या चेहऱ्यावर बारा वाजले होते . तेव्हाच आपला विजय निश्चित आहे असं मला जाणवलं आणि आज या रणरणत्या उन्हातही आपण सकाळपासून माझ्या सोबत आहात त्यामुळे आपण मला आपलं मत देऊन विजयी कराल असा विश्वास प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केला.

काँग्रेसच्या अनुसूचित जमाती सेल चे अध्यक्ष माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांनी महाराष्ट्रातील चंद्रपूर ची सीट ही काँग्रेस च्या दृष्टीने सगळ्यात सुरक्षित सीट असून प्रतिभा धानोरकर या सगळ्यात जास्त मतांनी निवडून येतील व महाराष्ट्रात पहिल्या 5 मध्ये या सीट चा विजय असेल असा आशावाद व्यक्त केला. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार सुभाष धोटे यांनी आमची प्रतिभा इमोशनल वाली नाही तर खंबीरपणे लढणारी आहे. सबका साथ सब का विकास म्हणता म्हणता चहा विकणारा आज रेल्वे विकतोय , देश विकतोय याकडे आपण लक्ष देण्याची गरज आहे . ही निवडणूक हुकूमशाही विरुद्ध लोकक्षाही अशी आहे , संविधान वाचविण्याची ही लढाई आहे म्हणून आपण प्रतिभा धानोरकर यांना प्रचंड बहुमताने विजयी करून लोकसभेत पाठवा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी घटक पक्षाचे दिलीप चौधरी, सोहेल शेख, आदींचीही समयोचित भाषणे झालीत. या सभेला काँग्रेसच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह गाव खेड्यातील नागरिकांचा अलोट प्रतिसाद लाभला होता.

**विजय वडेट्टीवार यांची अनुपस्थिती :** उमेदवारी मागण्याच्या वेळेस झालेल्या अटीतटीच्या वक्तव्यामुळे ताणले गेलेले संबंध यामुळे विरोधी पक्षनेते विजय भटितीवार हे रॅली आणि त्यानंतर होणाऱ्या सभेत उपस्थित राहतील असे सांगितले असतानाही आज प्रतिभा धानोरकर यांनी काढलेल्या भव्य रॅलीमध्ये किंवा त्यानंतर झालेल्या जाहीर सभेत सुद्धा विजय बडेट्टीवार हे उपस्थित झाले नाहीत . त्यामुळे प्रतिभा धानोरकर यांना वडेट्टीवार यांची साथ मिळणार का ? हा प्रश्न मात्र अजूनही अनुत्तरीत आहे .

# गाड्यांचा मोह सुटेना

आधुनिक केसरी

मध्य प्रदेशमध्ये काही महिन्यांपूर्वी भाजपाचे सरकार स्थापन झाले. माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी जवळपास १८ वर्ष मुख्यमंत्रीपद भूषविल्यानंतर यावेळी मोहन यादव यांना मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली. मध्य प्रदेशने नुकत्याच जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात गेल्या सहा महिन्यात ४२,५०० कोटींचे कर्ज असल्याचे समोर आले आहे. नवीन मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या सरकारने केवळ तीनच महिन्यात १७,५०० कोटींचे कर्ज काढले आहे. राज्य कर्जबाजारी असतानाही मंत्र्यांना मात्र नव्या गाड्या हव्या आहेत, यासाठी त्यांनी सरकारकडे मागणी केली आहे. मध्य प्रदेश सरकारच्या गॅरेज विभागाचे अधिक्षक आदित्य कुमार रिचारिया यांनी टाइम्स ऑफ इंडियाला माहिती देताना सांगितले की, मंत्र्यांनी नव्या गाड्यांची मागणी केली आहे. त्यामुळे नव्या गाड्या घेण्याचा प्रस्ताव अर्थ विभागाला पाठविण्यात आला आहे. अर्थ विभागाचा हिरवा कंदिल मिळाल्यानंतर गाड्यांची खरेदी केली जाईल, असे त्यांनी सांगितले. राज्याच्या गॅरेज विभागाकडे मंत्र्यांनी ३१ नव्या इनोव्हा क्रिस्टा वाहन घेण्याचा प्रस्ताव दिला आहे. त्यापैकी २८ मंत्र्यांना प्रत्येकी एक गाडी तर दोन उपमुख्यमंत्र्यांना प्रत्येकी दोन गाड्या दिल्या जाणार आहेत. सध्या मंत्र्याच्या ताफ्यात असणाऱ्या गाड्या तशा नवीनच आहेत. २०२२-२०२३ साली विकत घेतलेल्या या गाड्यांनी जेमतेम १० हजार ते २० हजार किमींचा प्रवास केलेला आहे, अशी माहिती प्रशासकीय अधिकाऱ्यांनी टाइम्स ऑफ इंडियाला दिली. नवीन गाड्या घेण्यासाठी राज्य सरकारला ११ कोटी रुपये खर्च करावे लागतील. याचा प्रस्ताव मार्च महिन्याच्या सुरुवातीला पाठविण्यात आला. नोव्हेंबर २०२३ मध्ये मध्य प्रदेशमध्ये भाजपाचे सरकार स्थापन झाले. मध्य प्रदेश सरकारवर एकूण ३.५ लाख कोटींचे कर्ज आहे. तसेच राज्य सरकारकडून महिन्याकाठी ३,५०० हजारांचे कर्ज काढले जात आहे. २० मार्च रोजी राज्य सरकारने काढलेल्या अधिसूचनेनुसार आणखी ५००० कोटींचे कर्ज काढले गेले आहे. आता नव्या गाड्या घेण्यासाठी सरकारला आणखी ११ कोटींचा निधी लागणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नव्या मंत्र्यांना ताफ्यातील गाड्या आवडत नाहीयेत. राज्यात विविध ठिकाणी दौरा करण्यासाठी त्यांना नव्या गाड्यांची अपेक्षा आहे. गॅरेज विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार मंत्र्यांच्या विनंतीनंतर मार्चच्या पहिल्याच आठवड्यात गाड्या विकत घेण्यासाठी प्रस्ताव दिला आहे. टाइम्स ऑफ इंडियाने सरकारमधील सूत्रांच्या हवाल्यानुसार मंत्र्याच्या गाड्या किती काळानंतर बदलण्यात याव्या, याचा काही नियम नाही. ॲम्बेसडोर गाड्या असण्याच्या काळात गाडी १.१ लाख किमी पळाल्यानंतर बदलली जात असे. हल्लीच्या गाड्या अद्ययावत तंत्रज्ञानाने उपयुक्त असून त्या ५ लाख किमी आरामात धावू शकतात, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# अवलिया अभियंत्याचे वीज क्षेत्रात योगदान

आधुनिक केसरी

**डॉ. मुरहरी केळे असे नाव ऐकले की, आपोआपच डोळ्यापुढे वीज क्षेत्र येते किंवा विजेचे क्षेत्र म्हटले की, डॉ. केळे यांचे नाव येते. पूर्वीच्या म. रा. वि. मं. किंवा आताच्या महावितरण या वीज क्षेत्रातील कंपनीचे ते एक महत्त्वाचे व्यक्ती असून त्यांनी आपल्या कार्याने या वीज क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. वीज क्षेत्राच्या विकासातून देशाचा विकास होईल हे त्यांनी ओळखले होते. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य या बरोबरच वीज ही मनुष्याला जीवनाश्यक झाली आहे. आजच्या तंत्र, यंत्र युगात वीज नसेल तर काय होईल ? असा प्रश्न पडतो. डॉ. केळे यांनी याच वीज क्षेत्रात नवनवे प्रयोग करून या क्षेत्राचा आलेख उंचावत नेला.**

वीज क्षेत्रासह शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य, अध्यात्म व प्रशासकीय क्षेत्रात त्यांनी अनेक प्रयोग करून आपली चुणूक दाखवली. आज ते आपल्या सेवेतून निवृत्त होत आहेत. परंतु त्यांनी आपल्या कारकीर्दीत वीज क्षेत्राला दिलेले योगदान कोणीही कधीच विसरू शकत नाही. त्यांच्या कार्याचा आवाका तर मोठाच आहे. विस्तारभयास्तव ते मांडणे शक्य नाही.



डॉ. केळे वीज मंडळात १९९१ मध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर रुजू झाले. त्यानंतर आपली नोकरी सांभाळत त्यांनी अभियांत्रिकीसह व्यवस्थापन, विधी, पत्रकारिता, संगणकीय, ऊर्जा अंकेक्षण या क्षेत्रातील पदव्यांसह पीएच. डी. संपादित केली. आपल्या कार्यक्षेत्रात विविध प्रयोग, उपक्रमाद्वारे त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. कनिष्ठ अभियंता ते व्यवस्थापकीय संचालक या प्रवासात त्यांनी जी पदे भूषविली त्या सर्वच पदावर ते 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे' या संत वचनाप्रमाणे भ्रष्टाचार न करता आपला पूर्ण वेळ कंपनीसाठी देत कार्य करीत राहिले. आपले पद कितीही मोठे असले तरी आपल्या कार्यालयाची वेळ व नियम त्यांनी पाळले. त्यांच्या वागणुकीमुळे कर्मचाऱ्यांना शिस्त लागली. आपल्या कार्यक्षेत्राच्या शोधाबाबत कोणी किती खोलात जावं? डॉ. केळे यांनी विजेचं मूळ शोधून त्यावर अभ्यास केला. विजेचं मूळ, विजेचा उगम, विविध साहित्यातील वीज असा अभ्यास करत आज निवृत्त होत आहेत. तरीही त्यांची या विषयावर पीएच.डी. सुरू आहे. त्यांच्या या शोधप्रबंधाने वीज क्षेत्रात येणाऱ्या पिढीस फायदा होणारच. याबरोबरच पॉवर डिस्ट्रीब्यूशन फ्रँचायजी सक्सेस स्टोरी ऑफ फर्स्ट फ्रँचायजी मॉडेल इन इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रीब्यूशन सेक्टर इन भिवंडी (२०१४), डिस्ट्रीब्यूशन फ्रँचायजी बिझनेस नागपूर केस स्टडी (२०१५), इलेक्ट्रिसिटी व्हॉयेज ऑफ पॉवर सेक्टर इन त्रिपुरा (२०१९) यावरील लेखन तसेच इंटरनॅशनल जर्नल ऑफ आर्टस अँड सायन्स हॉवर्ड युनिव्हर्सिटी, बॉस्टन, इंटरनॅशनल जर्नल ऑफ मॅनेजमेंट अँड इकॉनॉमिक्स, मकाऊ (चीन) बँकॉक (थायलंड), ईसा-मुंबई, फिक्की गांधीनगर, आयआयईएस-नागपूर, पॉवर लाईन न्यू दिल्ली, त्रिपुरा इत्यादीविषयी त्यांनी केलेले शोधप्रबंध सादरीकरण, असे अभ्यासाचे, संशोधनाचे काम ते सतत करत असतात.

काही काळ ते त्रिपुरा राज्य विद्युत मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक होते. त्या संधीचे त्यांनी सोने केले. तेथील वातावरण, भूभाग, समाज इ. नव्या बाबींशी ते सहज एकरूप झाले. त्या राज्याचा अभ्यास करून कंपनीत व्यावसायिकता आणण्यासाठी माहिती तंत्रज्ञान, मानव संसाधन व दक्षता विभागाची स्थापना केली. ग्राहकांसाठी स्मार्ट कस्टमर केअर कॉल सेंटरची स्थापना, आगरतळा या राजधानीच्या शहरात स्मार्ट मीटर्स व निमशहरी भागात प्रिपेड मीटर्स बसविण्यात आले. वीज गळती व हानी कमी करण्यासाठी पॉवर डिस्ट्रीब्यूशन फ्रँचायजी हे मॉडेल विकसित करून पाच विभागात त्याची अंमलबजावणी केली. एशियन डेव्हलपमेंट बँकेकडून निधी मिळवून त्यामध्ये कव्हर कंडक्टर्स, हाय व्होल्टेज डिस्ट्रीब्यूशन सिस्टीम, ऑटोरिक्लोजर व सेक्सनलायझर्स फॉल्ट पॅसेज इंटिक्रेटर्स, उपकेंद्राचे पुनरुज्जीवन दोन लाख स्मार्ट मीटर्स इ. सह ट्रान्सफॉर्मर्स यासाठी ऑनलाईन हेल्थ मॉनिटरिंग सिस्टीम आगरतळा शहरात सुरू केली. वीज क्षेत्रात ओपन सायकल गॅस बेस टेक्नॉलॉजीच्या ऐवजी कम्बाईन सायकल टेक्नॉलॉजी वापरून कार्यक्षमता वाढवली. या त्यांच्या कार्यामुळे त्रिपुरा हे राज्य विजेबाबत स्वयंपूर्ण झाले. इतकेच नाही तर, हे राज्य लाखो मेगावॅट वीज शेजारच्या राज्यासह नेपाळ व बांग्लादेश या दोन देशांना विकत आहे. डॉ. केळे यांनी भिवंडी येथील टोरेंट पॉवर येथे व मध्य प्रदेश येथे संचालक पदावर काम केले होते. त्या कार्यालयात त्यांनी सौभाग्य योजना प्रभावीपणे राबविल्यामुळे भारत सरकारतर्फे कंपनीला १०० कोटी रुपयांचे बक्षीस मिळाले होते. महाराष्ट्रामध्ये दामिनी पथकाची मुहूर्तमेढ त्यांच्याच काळातील. तसेच पूर्वीच्या एम.एस.ई.बी. व सध्याच्या महावितरण कर्मचाऱ्यांना वैद्यकीय विम्याची अंमलबजावणीही त्यांच्याच पुढाकारातून सुरू झाली. बदल्यामधील होणारे भ्रष्टाचार थांबवण्यासाठी त्यांच्या कार्यकाळात सर्व कर्मचाऱ्यांना न्याय मिळण्याकरीता महावितरणच्या एचआरएमएस पोर्टलद्वारे पारदर्शी पद्धतीने बदली आदेश निर्गमित करण्यात आले. तसेच ज्येष्ठता यादी विनियम सेवा विनियम व कंपनीतील सेवा भरती यामध्ये सुधारणा केल्या. स्वतःच्या आचरणातून त्यांनी कर्मचाऱ्यांना शिस्त लावली. ज्या ठिकाणी नव्याने गेले तेथे स्वच्छता मोहिम सुरू केली. कंपनीच्या पिण्याच्या पाण्याचा खर्च वाचवण्यासाठी आर.ओ. चे फिल्टर कार्यालयात बसवले. वाया जाणाऱ्या पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण केले. एवढी काळजी घेणारे ते एकमेव होते.

व्यवस्थापनाने त्यांच्यावर वेळोवळी अन्याय केला त्या सिस्टीमशी झगडत पण शरण न जाता, सभोवतालच्या परिस्थितीबद्दल तक्रार न करता, मिळालेले पद, उपलब्ध साधन सामुग्री, अंगी असलेली क्षमता, गुणवत्ता यांचा मेळ घालून आपल्या कार्याशी एकरूप होत. माणूस म्हणून तर त्यांच्या माणूसपणाचं फार मोठं योगदान आहे. कुठलाही स्वार्थ न ठेवता त्यांनी कंपनी हिताला प्रथम प्राधान्य दिले, दऱ्या-खोऱ्या, झोपड्या प्रकाशमय केल्या.

परिस्थिती कशीही असो आपले ध्येय कसे साध्य करावे याचा उत्कृष्ट वस्तुपाठ म्हणून डॉ. केळे यांच्या जीवनाकडे पाहता येते. डॉ. मुरहरी केळे यांच्या शिक्षणाचा, उच्च पदव्यांचा, त्यांच्या अभ्यासाचा, त्यांच्या साहित्याचा, त्यांच्या अध्यात्माचा, शोध प्रबंधाचा, देश पर्यटनाचा, त्यांच्या गुणी स्वभावाचा, शुद्ध आचरणाचा, त्यांनी अध्यात्म व विज्ञान यांची सांगड घालून केलेल्या प्रबोधनाचा, अध्यात्म व वीज या अभ्यासाचा, त्यांच्या सृजनशील प्रतिभेचा, त्यांच्या पारदर्शी दूरदृष्टीचा, त्यांच्या इमानदारीचा, त्यांच्यावरील संस्काराचा, त्यांच्या बहुआयामी अवलिया व्यक्तिमत्त्वाचा या कंपनीस खूप, खूप फायदा झाला. त्यांच्या या क्रांतिकारी, अतुलनीय योगदानामुळे कंपनीचा आलेख उंचावलेला आहे. त्यांचे हे योगदान कायम सुवर्ण अक्षरांनी कोरलेलं राहील. पिढ्या येतील, पिढ्या जातील परंतु आता ऐसे होणे नाही. आज जरी ते सेवानिवृत्त होत असले तरी त्यांनी केलेली भरीव कामगिरी, दिलेले योगदान कायम स्मरणात राहील, त्यांचे कार्य सतत प्रेरणा देणारे असेल.

हरिभाऊ कवडे

# निर्विचार अवस्था जीवनात शांती समाधान निर्माण करते



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**निर्विचार अवस्था जीवनात शांती समाधान निर्माण करते. हिच अस्वस्थ सर्व श्रेष्ठ उपल्बधी असून हि अवस्था जीवनात अर्जित करण्यासाठी विचारांचं व्रत करावं लागत तेव्हाच हि अवस्था अर्जित होते. जीवन म्हटलं की विविध दुःख,वेदना, अडचणी,समस्या,यांचं मुळ असून संबंध जीवन चक्र या भोवतीच फिरतं. मुख्यत्वे यासाठी आपले विचारच कारणीभूत असतात.मग त्याचे परिणाम हे आपल्या शरीरासह जीवनावर देखील होणारच या मध्ये शंका नाही.मग त्यातुनच निद्रानाश , व्यसनाधीनता,उदयास येते.आपल आरोग्य उत्तम ठेवण्यात आपल्या सुयोग्य विचारांच मोठं योगदान असतं.आणि हेच योगदान कायम आपल्या जीवनात राहव यासाठी आपण सतत एक तर सुयोग्य विचारांवर असलं पाहिजे अथवा विचार शुन्य राहता आलं पाहिजे.**


महणुन विचारांच काहूर थांबविण्यासाठी विचारांचं व्रत करा हाच संकल्प आपलं आयुष्य घडवु शकतो.विचारांचं व्रत जर आपल्याला करता आलं तर निर्विचार होण्यासाठी फार वेळ लागणार नाही. आणि आपलं जीवन निश्चितपणे सुखमय झाल्या शिवाय राहणार नाही.अनियंत्रित विचार हेच जीवनातील दुःखाचं मुख्य करणं आहे हेच मुख्य कारण समजुन घेऊन त्यावर नियंत्रण मिळवता आलं पाहिजे. अनियंत्रित विचारांना समुळ नष्ट करण्यासाठी आध्यत्मिक ज्ञान हा प्रभावी रामबाण उपाय आहे.आपल्याला अनियंत्रित विचारांवर नियंत्रण मिळवता आलं तर आयुष्य ब-यापैकी सोपं होतं.मुळात आपले अनियंत्रित विचार हेच आपला मुख्य शत्रु असून.आपला वास्तविक शत्रु सुद्धा जे नुकसान करू शकणार नाही ते नुकसान आपले विचार करत असतात.आणि हे विचार कमी करता आले पाहिजे.अथवा त्याची गती कमी करता आली पाहिजे.जगातील सगळ्यात वेगवान काही असेल तर ते आपले विचार.अगदी क्षणात विचारांचा काहुर उत्पन्न होत आणि होत्याच नव्हत करून टाकत. जीवनात आपण वेगवेगळ्या पद्धतीचे व्रत उपवास करतो.श्रद्धा असो कि बळजबरीने पण आपण ते करतो मात्र हे निश्चित आहे.मग आपण विचारांचं व्रत उपवास केला तर आपल्याला निर्विचार होण्यासाठी फार वेळ लागणार नाही.बहुतांश लोक आपल्या डोक्यातील विचार चक्र थांबविण्यासाठी व्यसनाच्या आहारी जातात.पण कोणत्याही व्यसना शिवाय विचार शुन्य होता आलं पाहिजे अथवा विचारांचा प्रभाव आपल्यावर झाला नाही पाहिजे. त्या साठी आपलं ज्ञान आणि विवेक कमी येतात व आध्यत्मिक ज्ञान हा सगळ्यात खात्रीचा मार्ग आहे. या मार्गावर आपण जो पर्यंत मार्गक्रमण करतोय तो पर्यंत विचार चक्र आपल्यावर परिणाम करू शकत नाही.आत्मा अमर आहे शरिर नश्वर आहे. मानवी जीवनात काही निश्चित नाही.जन्म निश्चित नाही आणि मृत्यु देखिल निश्चित नाही. आपण येताना सोबत काही आणलं नाही.सोबत फक्त केलेले चांगले वाईट कर्म घेऊन जाणार आहेत. चांगले वाईट कर्म याला आपण सोप्या भाषेत पाप पुण्य असु संबोधु शकतो.मग निश्चित काही नाही सोबत संपत्ती,धन, द्रव्य,दारा,यापैकी काही येणार नाही.मग आपण दैनंदिन जीवनात संसारीक बाबींच्या अनुषंगाने चिंतातुर का असतो.तर आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचे घडामोडी याची तुलना आपण आपल्या जीवनाशी करतो.आणि मग नको त्या दुःखाला निमंत्रण देतो.मुळात दुःखाचं मुळ नष्ट करता आलं पाहिजे.पण आपण तसं करत नाही तर वरवर प्रयत्न करतो.मग गडबड होते.हि गडबड होऊ नये म्हणून आपण आपल्या विचारांवर नियंत्रण मिळविण खुप आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला जास्तीत जास्त सत्याच्या मार्गावर मार्गक्रमण करण्याची आवश्यकता आहे. आणि ज्ञानाचा प्रकाश हा कायम आपल्या जीवनात तेवत ठेवता आला पाहिजे.म्हणजे अनियंत्रित विचार जरी थांबवता आले नाही तरी हे विचार आपलं जास्तीच नुकसान करू शकणार नाहीत.त्यासाठी आपल्याला विचारांचं व्रत उपवास करण गरजेचे आहे.आपल्या हिताचे आहे लाभाचे आहे.आपल्या आयुष्यासाठी कल्याणकारी आहे.हि बाब समजली पाहिजे. सार्थक विचार हितकारक असतात तर निरर्थक निरूपयोगी विचार नुकसान कारक ठरतात म्हणून निरर्थक निरूपयोगी विचार मुक्त होण्यासाठी निर्विचार अवस्था जीवनात अर्जित झाली पाहिजे आणि हि अवस्था अर्जित होण्यासाठी विचारांचं व्रत करावं लागत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शास्त्रीय गायनातील तेजस्वी पर्व पं. नाथराव नेरळकर

आधुनिक केसरी



***हिंदुस्तानी शास्त्रीय गायनातील तेजस्वी पर्व स्व. पंडित नाथराव नेरळकर यांना 29 मार्च 2024 रोजी यांचे शिष्य स्वर आदरांजली वाहणार आहेत. तापडिया रंगमंदिर, छत्रपती संभाजीनगर येथे सायंकाळी 6.30 वाजता हा कार्यक्रम होणार असून त्या निमित्त पंडितजींच्या विविध पैलूंचा परिचय करून देणारा हा विशेष लेख...***

गुरुजींना जाऊन तीन वर्षे होत आहेत. पण या तीन वर्षांत एकही दिवस 'गुरुजी' आम्हा शिष्यांच्या सहवासात नव्हते असा गेला नाही. मृत्यूनंतरही जिवंत राहणं कदाचित यालाच म्हटले जात असेल. गुरु शिकवताना शिकवून जात असतात त्या ज्ञानाची, त्या तत्त्वाची जाणीव त्या वेळेस निश्चितच नसते. पुढील आयुष्यात जगताना येणारा अनुभव त्या तत्वांची आणि त्या शिकवणीची आठवण करून देणारा असतो. शिक्षक म्हणून जगत असताना विविध विद्यार्थी अनुभवायला मिळत असतात. प्रत्येकाची बुद्धिमत्ता, सामाजिक, आर्थिक परिस्थिती, त्यांच्यात असलेले कौशल्य, जिद्द, चिकाटी, आवड, त्यांना लाभलेला निसर्ग, आणि त्यांच्यात असलेला आत्मविश्वास हा प्रत्येकाचा वेगवेगळा असतो. अशा प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या असलेल्या स्तरापासून उच्च स्तरावर नेण्यात गुरूंची कसोटी असते. अर्थात ज्याला हातोटी असते त्याच्यासाठी ते सहजही असतं. यात विद्यार्थ्यांचा अहम वाढू न देता त्याला त्याच ज्ञानाची आवड लावणं ही तारेवरची कसरतच असते. आणि हे सर्व गुरुजींना सहज जमत होतं. हे आज अनुभवायला येतं.

एखादी किचकट गोष्ट अगदी हसत खेळत विद्यार्थ्यांना समजावून सांगता आली पाहिजे हे काम गुरूंचं, असे ते म्हणायचे. शिकणं आणि शिकवण्याच्या प्रक्रियेत वेगवेगळ्या प्रसंगानुरूप विनोद आणि विनोदी किस्से सांगून वातावरण हसतं खेळतं ठेवण्यात ते यशस्वीच व्हायचे. शिकत असताना होणाऱ्या चुका या त्या विद्यार्थ्याच्या गायनातील चुका आहेत का? की त्याच्या स्वभावातील? हे त्यांनी ओळखलेलं असायचं आणि त्यानुसारच त्यांची उदाहरणेही असायची. स्वभावाचा आणि गाण्याचा जवळचा संबंध आहे, हे त्यांच्या शिकवणीत होतं. त्याची आज पदोपदी जाणीव होते. वरील संदर्भात एक उदाहरण म्हणून माझ्या संदर्भात घडलेला एक किस्सा या ठिकाणी सांगावासा वाटतो. एके दिवशी गुरुजी आलापी शिकवत असताना, आलाप योग्य ठिकाणी संपवून मुखड्याची मात्रा पटकन पकडता येत नव्हती. त्यात गुरुजी समोर असल्यावर आणखीनच भीती असायची. एकदा, दोनदा, तीनदा सांगूनही त्यांना अपेक्षित असं थांबून, मुखडा उचलून समेवर येता येत नव्हतं, त्या मात्रेच्या आधी किंवा नंतर आलाप संपायचा. शिकवणं थांबून ते एकदमच म्हणाले, मात्रा कशी सापडेल ना? इकडे तिकडे फिरायची रिकामी सवयच आहे. क्लास संपला की सरळ घरी जायचं सोडून पैठण गेटवर ज्यूस प्यायला का जायचं? ते ऐकून मी आतून प्रचंड घाबरलो होतो. थोड्या वेळासाठी पायाखालची जमीन निघालेली जाणवत होती. आदल्या दिवशी मित्रासोबत त्याच्या आग्रहामुळे आम्ही ज्यूस प्यायला गेलेलो होतो. हे त्याने आधीच येऊन सांगितलेलं होतं (पैसे मीच दिलेले होते.) माझा पडलेला चेहरा त्यांनी ओळखला आणि प्रेमाने समजावून सांगितलं, तुला चांगलं गाणं करायचं असेल तर नको त्याच्या संगतीत आपला वेळ वाया घालवू नये. नेहमी लक्षात ठेव. असे कित्येक प्रसंग प्रत्येक विद्यार्थ्यासोबत घडले असतील. विद्यार्थ्यांना चुकण्याआधीच मार्गदर्शन करणे, चुकल्यावर रागावणे, मग पुन्हा प्रेमाने समजावून सांगणे, खचल्यावर पाठीशी उभे राहणे हे त्यांच्या स्वभावात होतं. प्रतिकूल परिस्थितीला धैर्याने तोंड द्यावं, नकारात्मकतेला थारा देऊ नये, सकारात्मक विचार करून आत्मविश्वास बाळगावा, स्वच्छ मनानं आपलं कर्म करत राहावं, ही त्यांची शिकवणच होती. ते नेहमी म्हणायचे जोपर्यंत यशासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत, तोपर्यंत येणाऱ्या अपयशाला, पराभूत होणं नाही म्हणता येणार. अपयशातून यशाकडे वाटचाल सदैव सुरू ठेवावी. त्यांच्या या विचारांनुसार आम्हा सर्व शिष्यांची आजही वाटचाल सुरू आहे.त्यांच्या स्मरणार्थ नाथ स्वर महोत्सव 29 मार्च रोजी तापडिया रंगमंदिरात सायंकाळी 6.30 वाजता आयोजित केला आहे. ज्यात श्री. कृष्णा बोंगाने व श्रीमती अंकिता जोशी यांची जसरंगी व त्या नंतर पं. सुरेश तळवलकर यांचा तालयात्रेचा अप्रतिम कार्यक्रम आयोजित केला आहे. सर्वांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा स्वर्गीय आनंद घ्यावा असे आवाहन नाथ शिष्य परिवाराने केले आहे.

**दिनेश संन्यासी**

# पाणी हा विकासाचा आत्मा



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**पद्मभूषण श्री अण्णा हजारे तसेच पद्मश्री श्री पोपटराव पवार यांनी राळेगणसिद्धी व हिवरेबाजार गावामध्ये जल व्यवस्थापनाची सोय केली. आणि पाहता पाहता गावे भारताच्या नकाशावर आली. पाण्याचा थेंब थेंब त्यांनी साठवून ठेवला. त्यामुळे ही दोन्ही आदर्श गावे म्हणून नावारूपाला आली. मग आपण यांच्यापासून प्रेरणा घेऊन का जल व्यवस्थापनाचे कार्य हाती घेत नाहीत. पडलेल्या पाण्याचा थेंब का आपण साठवत नाही. आपआपल्यामधील हेवेदावे विसरून सर्वांनी एकत्रित येऊन कोल्हापुरी बंधारे बांधून जर पाण्याचे योग्य नियोजन केलं तर आपले सुद्धा गाव आदर्श होण्यास काही वेळ लागणार नाही. म्हणून सज्जनहो,जल, जंगल ,जमीन, जनावर वाचवण्यासाठी पाणी आवश्यक आहे. म्हणून पाण्याला विकासाचा आत्मा म्हणतात. पाणी हे जीवनाचे एक मूलतत्त्व आहे.**



वाचवील पाणी, साठवील पाणी, त्यालाच फक्त जगवील पाणी। पृथ्वीतलावर पाण्याचे साठे मर्यादित आहेत. त्यामुळे त्याचा वापर काटकसरीने करावे. हा संदेश वरील वाक्यातून दिला जातो. पाण्याला जीवन म्हटले आहे. गोड पाण्याचे साठे अल्प आहेत. त्यामुळे भविष्यात त्याचा वापर नियोजनबद्ध करा. काही लोकांनी भविष्यात तिसरे महायुद्ध हे पाण्यासाठीच असेल, म्हणून पाणी वाचवा, पाणी आडवा, पाणी जिरवा आणि आपले जीवन वाचवा . पाण्याचा थेंब थेंब हा महत्त्वाचा आहे.

उद्या शहरातील पाणीपुरवठा बंद राहील हे वाक्य कानावर आल्याबरोबर आपला गोंधळ होतो. कारण पाणी नसेल तर आपण आपल्या घरातील कोणतेही काम पूर्ण करू शकत नाही, म्हणून तर त्याला जीवन म्हणतात. कोरड्या राहणाऱ्या नद्या, नाले, बंधारे, तलाव, विहीर यांना आपणच जबाबदार आहोत. म्हणूनच हा पाण्यावर जनजागृती करण्यासाठी हा लेखन प्रपंच... भारतीय राज्यघटनेच्या 21 व्या कलमानुसार शुद्ध आणि स्वच्छ पाणी मिळणे हा प्रत्येक भारतीय व्यक्तींचा मूलभूत हक्क म्हणून सांगितला आहे. संत तुकाराम महाराजांनी पाणी हे जीवन आहे. असे म्हटले आहे. पाण्याशिवाय आपण कोणतीही गोष्ट पूर्ण करू शकत नाही. खरोखरच पशु- पक्षी, मानव या सर्वांना जीवन देणारे पाणीच आहे. पाण्यावरच सर्व सजीव सृष्टी आधारलेली आहे. म्हणूनच पाणी हे जीवन आहे .त्यासाठी तुम्ही पाणी आवश्यक तेवढेच जपून वापर करा, पाऊस जर पडत नसेल तर ही सजीव सृष्टी राहणार नाही. आज जिकडे -तिकडे पाण्यासाठी वन वन भटकावे लागते. निसर्गाचा असमतोल वाढत आहे. प्रचंड वृक्षतोड होत आहे. औद्योगीकरण ,शहरीकरण यामुळे पाण्याचे नैसर्गिक जलचक्र बिघडत आहेत. पावसाळ्यामध्ये जास्त पाऊस पडत नाही. जून ते सप्टेंबर या कालावधी मध्ये भारतात पाऊस पडतो. नैऋत्य मोसमी वाऱ्यांपासून पाऊस आपल्याला मिळतो. खरोखर गरजेपुरते पाणी वापरा, पाण्याची नियोजन आणि व्यवस्थापन करा. ही काळाची गरज आहे. काही वर्षापूर्वी मराठवाड्यातील लातूर येथे पाणीटंचाई निर्माण झाली होती. अक्षरशः लोक रात्रभर पाण्यासाठी जागी होते. रेल्वेने लातूरला पाणी नेऊन तेथील लोकांना पाण्याची तहान भागवावी लागली, हे जीवंत उदाहरण आहे. म्हणून पाण्याचा वापर काळजीपूर्वक करा. पृथ्वीवर 71% पाणी 29% जमीन आहे .तरी पिण्यायोग्य पाणी अतिशय थोडे आहे. गाव, पाडे वाड्यावस्तीवर टँकरद्वारे पाणी न्यावे लागते.पाणी जर चांगले असेल तर आरोग्य चांगले राहते. जर पाणी दूषित निघाले तर आरोग्य बिघडते. पाण्याशिवाय आपण जीवन जगू शकत नाही. पाणीटंचाई जवळ जवळ आता सर्वत्र भासत आहे. महाराष्ट्र राज्यात जवळजवळ 20,200 गावांना पाणीटंचाईने सध्या ग्रासलेले आहे. पाऊस पडत नसेल तर सरोवरांना, नद्यांना, तळ्यांना पाणी कुठून येणार? पाणीच नसेल तर गुरांना चारा मिळणार नाही. म्हणून पाणी हे जीवनाचे एक मूलतत्व आहे. चीन, अमेरिका, इस्राईल, जपान या देशातील जलसंवर्धनाच्या पद्धती आपल्या देशात राबवाव्या लागतील, तरच पाण्याचा योग्य वापर केला जाईल क्योटो या ठिकाणी दि. 16 ते 23 मार्च 2004 च्या जागतिक जलपरिषदेत पाणी या विषया वर सांगोपांग चर्चा करण्यात आली होती. आज पिण्याच्या पाण्याच्या बाटलीला किंमत मोजावी लागत आहे. भारतीय संस्कृतीमध्ये पाण्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. गंगा, यमुना, सरस्वती, कावेरी, नर्मदा, गोदावरी, सिंधू, कृष्णा, कोयना,चंद्रभागा या जीवन सरिता आहेत.आजही भारतीय लोक भक्ती भावाने या नद्यांचे पूजन करून कुंभमेळ्याच्या वेळी शाही स्नान करून पुण्य पदरात पाडून घेतात. कृषी क्षेत्रासाठी पाण्याची आवश्यकता आहे .म्हणून पाणी वाचविण्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन विचार विनिमय करून पाणी आडवा, पाणी जिरवा ही सामाजिक वनीकरण मोहीम यशस्वी केली पाहिजे. पाणी हे जीवनात किती महत्त्वाचे आहे ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी घरातील पाण्याचा हौद पाणी पिण्या साठी खुला करून दिल्याने कळाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महाड येथील चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी सत्याग्रह करावा लागला. संत कबीरांनी सुद्धा पाण्याचे महत्व सांगितले, प्रत्येकाने वृक्ष लावले पाहिजेत, नसता पाणी मिळेल का हो पाणी हे वाक्य ऐकून घ्यावे लागेल. हे सगळं टाळायचं असेल तर पाण्याची योग्य नियोजन करा. जल प्रदूषण , वाढत चाललेले तापमान, वृक्षतोड यामुळे निसर्ग निर्मित सरोवरे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत दरवर्षी 1 से,ने तापमान वाढत आहे. ही चिंतेची बाब आहे. तुम्ही पाण्याला वाचवा, पाणी तुम्हाला वाचवील, तहान लागली की घोटभर पाणी महत्त्वाचे आहे. तेथे जडजवाहीर उपयोगी नाहीत, आभाळातिल बहुमोलाचा ,थेंब आज हा पाण्याचा आहे. म्हणून निसर्गाचे मोल जाणावे, स्वतः फसवू नये. पाणी फेकून देऊ नये, हवे तेवढेच वापरावे. नाहीतर गायक प्रल्हाद शिंदे म्हणतात पड रं पाण्या, पड रं पाण्या कर पाणी पाणी, शेत माझं लई तान्हेंल चातकावाणी.. म्हणून पाणी कपात करायला शिका, नाहीतर कपात पाणी मिळेल. म्हणून जल जपून वापरावे. हे सर्व देशवासियांनी लक्षात घ्यावे.



# आला उन्हाळा आरोग्य सांभाळा....!

राज्यात सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. मार्च महिन्याच्या मध्यापासून राज्यातील तापमान वाढायला सुरुवात झाली होती. सर्वत्र उकाडा जाणवत होता. आता मार्च महिन्याच्या अखेरीस तर राज्यातील अनेक शहरांचे तापमान उच्चांकी पातळीवर पोहचले आहे. राज्यातील अनेक शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात पोहचले आहे. काही शहरांनी तर ४० अंशाचा आकडा देखील पार केला आहे. विदर्भ मराठवाड्यात तर तापमानाने आजच उच्चांक गाठला आहे. पुढील दोन आठवड्यात राज्यातील सर्वच शहरांचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या घरात पोहचेल आणि राज्यात प्रचंड उकाडा जाणवेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढील दोन महिने राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल आणि राज्यात यावर्षी प्रचंड उकाडा जाणवेल हा हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरताना दिसत आहे. याशिवाय यावर्षी राज्यात उष्णतेच्या लाटा येतील असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हा अंदाज नागरिकांची झोप उडवणारा ठरत आहे कारण मार्च महिन्यातच सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली असल्याने पुढील दोन महिने कसे निघेल याच चिंतेत नागरिक आहेत. पुढील दोन महिन्यात राज्यात उष्णतेच्या लाटा येणार असून तापमान प्रचंड वाढणार असल्याने हे दोन महिने जनतेसाठी जीकरीचे ठरणार असल्याने उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागणार आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाळ्याच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिणाम माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. रक्तदाब आणि मधुमेहासारख्या व्याधी असलेल्या व्यक्तींनी उन्हाळ्यात विशेष खबरदारी घ्यावी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळीच उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता असते. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे. दुपारी बारा ते चार घराबाहेर पडूच नये, काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ, सच्छिद्र कपडे वापरावेत. उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा.

**श्याम ठाणेदार**
**मो. ९९२२५४६२९५**

# शरद पवारांचे मनसुबे फडणवीसांनी हाणून पाडले

आधुनिक केसरी

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर शरदचंद्र पवारांचा मुळ राष्ट्रवादी पक्ष फुटल्याने चवताळलेल्या पवारांनी महायुतीवरच हातोडा चालवत घटक पक्ष असलेल्या रासपा नेते महादेव जानकरांना महाविकास आघाडीत ओढुन माढा लोकसभेची जागा देण्याचा प्रयत्न केला. त्याचं कारण बारामती सुरक्षित रहावी म्हणुन धुर्त डाव टाकण्याचे त्यांचे मनसुबे अखेर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उधळुन टाकताना माढाच्या दाढेत जानकरांना अखेर जावुच दिले नाही.



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

रासपाला एक जागा देवुन सन्मान महायुतीमध्येच करण्याचा त्यांचा प्रयत्न असताना परभणीतुन लोकसभा निवडणुकीची त्यांच्यासाठी जागा आरक्षित केली असल्याचे सुत्रांनी सांगितले. जानकरांमुळे बारामती लोकसभा मतदारसंघात महायुतीसाठी राजकिय अनुकुलता मोठ्या प्रमाणावर झाल्याशिवाय रहाणार नाही. वर्तमान राजकिय उलाढालीत चांगलाच हिसका महायुतीच्या नेत्यांनी पवारांना दाखवुन दिला हे मात्र नक्की. महादेव जानकर महायुतीचे घटक पक्ष असुन स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या नेतृत्वाखालीच त्यांनी 2009 ला थेट घटक पक्ष म्हणुन सहभाग घेतला. मागच्या वेळी त्यांनी बारामतीची निवडणुक लढवुन सुप्रियाताई सुळेंना जेरीस आणल्याचा राजकिय इतिहास आहेच. कारण त्या मतदारसंघात जानकरांना मानणारा मोठा वर्ग असल्याने धुर्त डाव साधण्याचा शरद पवारांचा प्रयत्न होता. जानकर विधान परिषदेवर सद्या आहेत. मध्यंतरी कॅबिनेट मंत्री म्हणुन देखील महायुतीत त्यांचा समावेश होता. राज्यात 2019 नंतर महाविकास आघाडीचं सरकार सत्तेवर आलं. कालांतराने जानकर थोडेसे दुरावल्यासारखे होते. मात्र अंतर्मनाने कधीच दुरावले नाहीत. बाह्य अंगाने मात्र अधुनमधुन त्यांचे येणारे वक्तव्य थोडंसं रूसल्यासारखं होतं. भाजपा नेत्या पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत देखील त्यांचं बहिण-भावाचं नातं अतुट आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जानकरांना हाताशी धरून किंवा त्यांच्या नाराजीचा फायदा घेत शरद पवारांनी महायुतीवर हातोडा टाकण्याचा प्रयत्न सुरू करताना बारामतीच्या मळ्यात जानकरांच्या सोबत दोन-चार बैठका केल्या. महाडा लोकसभेची जागा जानकरांना देण्याची व्युहरचना पवारांनी केली होती. यामागे त्यांचा मोठा डाव होता. कारण कन्या खा.सुप्रियाताई सुळे बारामती लोकसभा मतदारसंघातुन निवडणुक लढवत आहे. त्यांच्या विजयासाठी जानकरांचा हातभार निश्चित लागु शकतो असा राजकिय अंदाज पवारांचा होता. माढातुन जानकर विजयी झाले काय?किंवा पराभव झाले काय? याच्याशी काही देणेघेणे नव्हते पण त्यांना महाविकास आघाडीत घेतले तर बारामतीची वाट धनगर समाजाच्या मतामुळे सुखाची होईल असा त्यांना राजकिय अंदाज होता. जानकरांनी देखील माढ्यात जावुन कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला होता. त्यांचे वक्तव्य पहाता जणुकाही महायुतीतुन जानकर बाहेर पडले असं चित्र निर्माण झालं होतं. मात्र राजकारणाच्या चित्रपटात कोणत्या वेळी काय होईल? कधीच सांगता येत नसते. महायुतीचं नेतृत्व करणारे देवेंद्र फडणवीस या साऱ्या परिस्थितीवर लक्ष्य ठेवुन होते. जानकर हे महायुतीसोबत अनेक वर्षापासुन आहेत. ते पवारांच्या सोबत जावु शकणार नाहीत याची खात्री देवेंद्र फडणवीसांना होती. जानकरांची रस्सीखेच सुरू असताना एव्हाना शरद पवार जानकर हे आपल्याकडे आलेच केवळ आता घोषणा बाकी असं गृहीत धरून असताना देवेंद्र फडणवीसांनी राजकिय डाव खेळला ज्यात त्यांना यश आले. पण खऱ्या अर्थाने पवारांचे मनसुबे उधळुन टाकताना माढ्यात टाकलेला पवारी गळ परतुन लावुन जानकरांनाच सोबत ठेवले. कदाचित परभणी लोकसभा मतदारसंघातुन महादेव जानकर महायुतीचे उमेदवार म्हणुन पुढे येवु शकतात. या





मतदारसंघात भाजपाचा एक आमदार, रासपाचा एक आमदार आणि महायुतीचे घटक असलेले अजितदादा पवारांची ताकद मोठ्या प्रमाणावर आहे. शिवाय जानकर अनेक वर्षापासुन या भागात संपर्क ठेवुन असल्याने त्याहुन अधिक धनगर समाज देखील मोठ्या प्रमाणावर असल्याने त्यांचा विजय इथं कुणीच रोखु शकत नाही. दुसरी बाजु म्हणजे बारामती लोकसभा निवडणुकीत सुमित्रा अजितदादा पवार महायुतीच्या उमेदवार रहाणार त्यांच्या विजयात जानकरांची मदत होवु शकते. राज्यात आता धनगर समाजाचे सर्वच प्रमुख नेते महायुतीसोबत आहेत. गोपीचंद पडळकर, राम शिंदे, जानकर यांच्याशिवाय अन्य प्रमुख देखील महायुतीत थेट असल्याने धनगर समाजाची राजकिय मदत खऱ्या अर्थाने इथं महायुतीच्या सर्व उमेदवाराला होवु शकते. महादेव जानकर ज्यांचं राजकिय आयुष्य संघर्षातुन वंचित, उपेक्षित आणि समाज बांधवांच्या कल्याणासाठी गेलेलं आहे. अनेकदा त्यांनी लोकसभेच्या निवडणुका लढवल्याचा इतिहास राहिलेला असुन चळवळीतला प्रमुख नेता अशी त्यांची ओळख आहे. त्यांनी एकदा दिल्लीला जावं अशी सामान्य कार्यकर्त्यांची प्रचंड इच्छा असल्याने त्यांच्या विजयाकडे सर्वांच्या नजरा लागलेल्या आहेतच. अखेर त्यांनी महायुतीत राहण्याचा घेतलेल्या निर्णयाचे स्वागत समाज बांधवासह त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या सर्व जनसामान्य कार्यकर्त्यांनी केल्याचं लक्षात येतं. एक गोष्ट निश्चित आहे की, शरद पवार यांनी जानकरांना लावलेला गळ त्यातले मनसुबे उधळुन टाकण्यात मात्र देवेंद्र फडणवीसांना आलेलं यश लोकसभा निवडणुक पुर्वरंगात सकारात्मक म्हणावे लागेल. खरं तर राज्याच्या राजकारणात मागच्या पन्नास वर्षात पवारांचे मनसुबे उधळुन टाकणारा राजकिय शत्रु त्यांना कदाचित भेटला नसेल. स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी पवार निती विरोधात राजकारण करताना प्रस्थापितांचे बुरूज ढासळुन दाखवले. बीडसारख्या जिल्ह्यात त्यांनी कधीच डाळ शिजु दिली नाही. त्यापैकीच फडणवीस असे एक नेते पवारांना वस्ताद मिळाले ज्यातुन त्यांचे राजकिय मनसुबे फडणवीस उधळुन टाकु लागले. एक तर मुळ राष्ट्रवादी पक्ष अजितदादा बाहेर पडल्यानंतर फुटुन गेला. निवडणुक आयोगाने देखील दादा गटाला चिन्हासह मान्यता दिली. घड्याळ अधिकृत चिन्ह म्हणुन उपयुक्त वापर करता येणार असे निकाल त्यांच्या बाजुने आले. या सर्व घालमेळीत मोठे पवार राजकियदृष्ट्या अवसानगलित गात्र झाले असुन बाहेरच्या जागा सोडा बारामती जिंकुन आणणे त्यांच्यासाठी फार मोठे आवाहन उभा राहिले. ज्यामुळे त्यांनी रक्ताची नाती सारी जमा करायला सुरूवात केली. पण या मतदारसंघातसुद्धा अजितदादा पवार यांची असलेली लोकप्रियता नविन पिढी त्यांच्यासोबत असल्याने महायुतीचे उमेदवार निवडुन आल्याशिवाय रहाणार नाहीत. जानकरांचा राजकिय फायदा त्या मतदारसंघात निश्चित होवु शकतो. 2014ला लोकसभा निवडणुक जानकरांनी येथुन लढवली होती. अपेक्षापेक्षा जास्त मतदान त्यांना मिळालं होतं. यावेळेस परभणीतुन त्यांचा विजय समीप असताना बारामतीतील त्यांचे अनुयायी तथा धनगर समाज मोठ्या प्रमाणावर महायुतीच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहिल्याशिवाय राहणार नाही. फडणवीसांनी बारामतीची खिचडी शिजवुन ठेवली. कारण माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि अजितदादा पवार यांच्यातली मध्यस्थी देखील लाभाची ठरली. ज्यामुळे आता महायुतीच्या उमेदवार सौ.सुमित्रा अजितदादा पवार यांच्यासाठी राजकिय वाट सहज सोपी झालेली दिसते. सांगायचं तात्पर्य एवढंच आहे की, शरद पवारांचे मनसुबे उधळुन टाकण्यात देवेंद्र फडणवीसांना अखेर यश आले.

# चंद्रपुरात विकासाचे कमळ फुलणार ?

आधुनिक केसरी

लोकसभा २०२४ च्या निवडणुकीतील महाराष्ट्रातील सगळ्यात जास्त हॉट सीट म्हणून चंद्रपूरच्या सीट कडे न केवळ महाराष्ट्राचे तर संपूर्ण भारताचे लक्ष लागलेले आहे . 2019 च्या निवडणुकीमध्ये सुद्धा चंद्रपूर वनी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्राची निवडणूक ही भारताचा केंद्रबिंदू असलेली निवडणूक ठरली होती. कारण ही निवडणूक केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर विरुद्ध काँग्रेसचे सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांच्यामध्ये



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

झालेली होती . दारूबंदी आणि जातीचे राजकारण या दोन विषयांवर ही निवडणूक लढल्या गेली . काँग्रेसच्या बाळू धानोरकर यांनी तत्कालीन केंद्रीय गृहराज्यमंत्री असलेल्या हंसराज अहिर यांचा तब्बल 44 हजार मतांनी पराभव करत महाराष्ट्रातून काँग्रेसची एकमेव सीट निवडून आणलेली होती. तेव्हापासूनच चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्राकडे संपूर्ण भारताचे लक्ष लागलेलं होतं. यावर्षी सुद्धा ही सीट महाराष्ट्रातील सगळ्यात " हॉट सीट " म्हणून या सीट कडे सगळ्यांच लक्ष लागलेल आहे. महाराष्ट्रातील वन व सांस्कृतिक मंत्री तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री असलेले सुधीर मुनगंटीवार विरुद्ध काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकर अशी थेट लढत या लोकसभा क्षेत्रात होणार आहे .

२०१९ च्या निवडणुकीमध्ये चंद्रपूर मधील दारूबंदी हा एक महत्त्वाचा विषय होता . त्यामुळे दारूवाला हवा की दूधवाला हवा ? असा थेट सवाल करत बाळू धानोरकर यांनी तळीरामांना साद घातली होती . शिवाय ओबीसी समाजाला एकत्र आणण्यात बाळू धानोरकर यांनी यश मिळविले होते . या निवडणुकीत काँग्रेसने ओबीसी , मुस्लिम , दलित अशी मोट बांधून प्रचार केला . आणि या प्रचारात आघाडी घेत बाळू धानोरकर यांनी विजय संपादन केला . त्यावेळच्या निवडणुकीमध्ये विजय वडेट्टीवार यांची मोलाची साथ बाळू धानोरकर यांना लाभली होती . यावर्षी मात्र वडेट्टीवारांनी बाळू धानोरकर यांच्या निधनानंतर नैसर्गिक नियमाप्रमाणे या जागेवर आपला हक्क सांगणाऱ्या त्यांच्या पत्नी प्रतिभा धानोरकर यांच्याविरुद्ध आपली मुलगी शिवानी वडेट्टीवार हिला उमेदवारी मिळावी यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत प्रचंड जोर लावला . यात बरेचदा दोन्ही बाजूंनी एकमेकांवर बोचऱ्या टीका ही केल्या . त्यामुळे या निवडणुकीत वडेट्टीवार हे धानोरकरांच्या पाठीशी उभे राहतील का ? हा प्रश्नच आहे . शिवाय ज्याप्रमाणे बाळू धानोरकर यांनी 2019 मध्ये संपूर्ण ओबीसी समाजाची एक मोट बांधण्यात यश मिळवले होते तसेच यश प्रतिभा धानोरकर यांना मिळेल का ? हाही एक प्रश्न आहे . कारण 2019 च्या निवडणुकीनंतर बाळू धानोरकर यांनी स्वतः खासदार झाल्याबरोबर आपल्या पत्नीला काँग्रेसची उमेदवारी मिळवून देत त्यांना आमदार केलं होतं . तर , भाऊ अनिल धानोरकर हे भद्रावती नगरपरिषदेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते . संपूर्ण कुटुंबात तीन लोक सत्तास्थानी होते . त्यामुळे विकास मोठ्या प्रमाणात होईल अशी अपेक्षा भद्रावती वरोरा विधानसभा निर्वाचन क्षेत्राला होती . परंतु यात भद्रावती व वरोरा वासियांची निराशा झाली . जो विकास या विधानसभा क्षेत्रात अपेक्षित होता तेवढा विकास न झाल्याने एकाच परिवारात सत्ता हा विषय या निवडणुकीत केंद्रस्थानी राहणार हे निश्चित . शिवाय वडेट्टीवार मुनगंटीवार यांची मैत्री सर्वश्रुत असल्याने सुद्धा वडेट्टीवार धानोरकरांना मदत करतील का ? हा ही एक अनुत्तरीत प्रश्न आहे. काँग्रेसचे गटातटाचे राजकारण एका बाजूला तर उमेदवारी मिळवण्यावरून झालेल्या धुमश्चक्रीत ताणले गेलेले संबंध अशी पार्श्वभूमी यावर्षीच्या निवडणुकीला राहणार आहे .





भाजपाच्या दृष्टीने सुद्धा ही निवडणूक भाजपासाठी वाटते तितकी सोपी राहणार नाही हेही तेवढेच खरे . कारण मुनगंटीवार यांच्यावर व्यक्तीशः नाराजीचे प्रमाण पक्षांतर्गतच जास्त आहे . सातत्याने मिळालेले यश , भूषविलेली मोठ मोठी मंत्रिपदे , वजनदारपणा यातून आलेला अहमभाव आणि आपण म्हणून तेच झाले पाहिजे या वृत्तीकडे चाललेला त्यांचा स्वभाव यामुळे दुखावलेले कार्यकर्ते , पदाधिकारी नाराज आहेत . दुसऱ्या बाजूला मागच्या निवडणुकीमध्ये हंसराज अहिर यांचा जो पराभव झाला त्या पराभवामध्ये पक्षांतर्गत असलेला कलह याचाही मोठा वाटा होता . आणि हा पराजय हंसराज अहिर यांना प्रचंड जिव्हारी लागलेला होता . त्यामुळे या निवडणुकीत अहिर आपला हा राग कशा पद्धतीने व्यक्त करतात ? यावर मुनगंटीवार यांचे विजयाचं लक्ष अवलंबून असेल . शिवाय संपूर्ण ओबीसी समाज एकवटण्यात धानोरकरांना यश मिळालं तर ही निवडणूक भाजपासाठी डोकेदुखी ठरू शकते . कारण 2019 च्या निवडणुकीमध्ये भाजपाच्या दुसऱ्या फळीतील सर्व पदाधिकारी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी ओबीसी म्हणून एकत्र येत अहिरांचा पराभव केलेला होता हे एक कटू असले तरी सत्य आहे . त्यामुळे आता दुसऱ्या फळीतील हे पदाधिकारी व त्यांचे कार्यकर्त खरोखरच सुधीर मुनगंटीवार यांना मतदान करतील का ? की जातीय राजकारणात एकत्र येत मुनगंटीवार यांनाही एकदा धडा शिकवावा हा विचार करतील ? हा गंभीर प्रश्न आहे . जो पक्षांतर्गत चांगलाच चर्चिल्या जात आहे . तर , मुनगंटीवार यांनी घेतलेले मोठमोठे भव्यदिव्य कार्यक्रम ज्यामध्ये विसापूर येथील अथेलेटिकस , स्थानिक चांदा क्लब ग्राउंड वर झालेला कृषी महोत्सव , ताडोबा महोत्सव , एडवांटेज चंद्रपूर , मेरी माटी मेरा देश अशा कोणत्याही कार्यक्रमात हंसराज अहिर दिसले नाहीत. शिवाय , महायुतीच्या पहिल्याच मेळाव्यात त्यांनी आपल्या पराभवाबद्दल खंत व्यक्त करत व्यासपीठावर उपस्थित सुधीर मुनगंटीवार यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांना माना खाली घालायला लावल्या होत्या हेही विसरता येणार नाही . दुसऱ्या बाजूने विचार करता काँग्रेसच्या गटातटा चे राजकारण मुनगंटीवार स्वतःच्या फायद्याच्या साठी करून घेऊ शकतात का ? वडेट्टीवारांची मैत्री मुनगंटीवार साठी शुभ फलदायी ठरू शकेल का ? हा प्रश्न आहे . वास्तविक पाहता सुधीर मुनगंटीवार हे विकासाच्या राजकारणावर भर देणारे व्यक्तिमत्व आहे . परंतु अमृत योजना मुळे प्रत्येक गल्लीबोळात फोडून ठेवलेले चंद्रपूर , कोरोना काळामध्ये महानगरपालिकेतील भ्रष्टाचार आणि भव्यदिव्य कार्यक्रमांच आयोजन करून चंद्रपूरकरांच्या पैशाची केलेली लूट , त्यात स्थानिकांना असलेले नगण्य स्थान आणि रोजगाराच्या निर्माण केलेल्या संधी यावर चंद्रपूरकर सुद्धा मुनगंटीवार यांच्यावर नाराज असल्याचे दिसून येते . तर मोदींच्या विरोधात असणारा मुस्लिम समाज मुनगंटीवार यांना मोदींचे हात बळकट करू देतील का? हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे . कारण मुस्लिम समाजाची एक गठ्ठा मते ही काँग्रेसला जातात हा पूर्वानुभव आहे . एकीकडे विकासाचे राजकारण , दीर्घ अनुभव , आणि महाराष्ट्रात भूषविलेली विविध वजनदार मंत्री पदे , वक्तृत्व ,कर्तृत्व आणि नेतृत्व यावर ठळकपणे समोर येणार महाराष्ट्रातलं नाव म्हणून सुधीर मुनगंटीवार . तर , दुसऱ्या बाजूला काँग्रेस तर्फे ओबीसी चेहरा म्हणून प्रतिभा धानोरकर या पति निधनानंतर स्वाभाविकपणे येणारी सहानभूती , लोकसभेसाठी पहिल्यांदाच एक महिला उमेदवार म्हणून महिलांचा मिळणारा प्रतिसाद आणि बहुतांश निवडणुकीमध्ये मुस्लिम ओबीसी दलित अशी एक गठ्ठा मते पडणारा काँग्रेस पक्ष. या पार्श्वभूमीवर चंद्रपुरात 2019 ची पुनरावृत्ती होणार की विकासाचे कमळ फुलणार याकडे आता संपूर्ण महाराष्ट्रासह देशाचे लक्ष लागलेले आहे.






# नितीन गडकरी यांना विक्रमी मताधिक्याने निवडून द्या

## नागपूर येथील सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत संकल्पाचे सरसेनापती असलेल्या नितीन गडकरी यांना विक्रमी मताधिक्याने निवडून द्या, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी नागपूर येथे केले. नागपूर मतदारसंघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपब्लिकन पक्ष महायुतीचे उमेदवार केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी झालेल्या विशाल जाहीर सभेत फडणवीस बोलत होते. या सभेला भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खा.प्रफुल्ल पटेल, रामटेकचे महायुतीचे उमेदवार राजू पारवे, पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे नेते माजी खासदार जोगेंद्र कवाडे, सुलेखा कुंभारे यांच्यासह महायुतीच्या घटक पक्षातील नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेनंतर महायुतीने विधान भवन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत प्रचंड शक्तिप्रदर्शन करत काढलेल्या भव्य मिरवणुकीने गडकरी यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करताना गडकरी यांच्यासमवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खा. प्रफुल्ल पटेल उपस्थित होते. जाहीर सभेत बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी "नितीन गडकरी हे पंतप्रधान मोदींचे सरसेनापती आहेत" अशा शब्दांत गडकरी यांचा गौरव केला. ते म्हणाले की, गेल्या 10 वर्षांत मोदी सरकारने केलेले कार्य हा एक ट्रेलर आहे. देशाला विकसित, सामर्थ्यशाली बनवण्यासाठी अजून बरेच काही घडायचे आहे. मोदीजींच्याच नेतृत्वाखाली पुढच्या पाच वर्षांत गरीबीमुक्त, बेरोजगारी मुक्त व समता युक्त भारत घडवायचा आहे. पंतप्रधान मोदींनी 2047 पर्यंत विकसित भारत बनवण्याचा संकल्प केला आहे त्याची मुहूर्तमेढ पुढच्या पाच वर्षांत रोवली जाणार असून त्यासाठी मोदीजींना सलग तिस-यांदा पंतप्रधान बनवायचे आहे, असा निर्धार फडणवीस यांनी व्यक्त केला. भंडारा-गोंदिया मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार विद्यमान खासदार सुनील मेंढे यांनीही बुधवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी झालेल्या सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे खा. प्रफुल्ल पटेल आदी नेत्यांची उपस्थिती होती.




## नागरिकांच्या तक्रारीकरिता निवडणूक निरीक्षक राहणार उपलब्ध

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे 19 एप्रिल 2024 रोजी होणार असून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.
या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक आयोगातर्फे सामान्य निवडणूक निरीक्षक, कायदा व सुव्यवस्था निरीक्षक आणि खर्च निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. तिनही निवडणूक निरीक्षक नागरिकांच्या सुचना / तक्रारी ऐकण्यासाठी वन अकादमी येथे उपलब्ध राहणार असल्याचे प्रशासनाने कळविले आहे. सामान्य निवडणूक निरीक्षक म्हणून मध्यप्रदेशचे अन्न नागरी पुरवठा तथा ग्राहक संरक्षण विभागाचे सचिव लोकेशकुमार जाटव (मो.9404912593) हे नागरिकांचे मत, तक्रारी ऐकूण घेण्यासाठी वन अकादमी येथील व्हीव्हीआयपी रेस्ट हाऊस येथे त्यांचे कार्यालय 'बकूळ' येथे सकाळी 10.30 ते दुपारी 12.30 या वेळेत उपलब्ध राहतील. कायदा व सुव्यवस्था निवडणूक निरीक्षक म्हणून केरळच्या दहशतवादविरोधी पथकाचे पोलिस अधिक्षक सुजीत दास (मो. 9307274907) हे वन अकादमी येथील व्हीव्हीआयपी रेस्ट हाऊस येथील 'शाल्मिक' येथे सकाळी 9.30 ते सकाळी 11 पर्यंत उपलब्ध राहणार आहेत.
तर निवडणूक खर्च निरीक्षक हेमंत हिंगोनिया (मो. 9404921146) हे नागरिकांचे मत, तक्रारी ऐकूण घेण्यासाठी 'बकूल' व्हीव्हीआयपी कक्ष, कौस्तुभ बिल्डींग, वन अकादमी येथे सकाळी 9.30 ते सकाळी 11 वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत.



## सोबलगाव ते पाडळीमधील रस्ता कामात अनेक त्रुटी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील सोबलगाव धरण ते पाडळी दरेगाव मुख्य रस्ता पर्यंत नुकते खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण चे काम नुकतेच करण्यात आले मात्र सदर काम आत व दुर्लक्षित असल्याने काम पुर्ण करण्यात आले मात्र त्यात अनेक त्रुट्या असल्याचे चित्र असुण विभागाचे सभ आलबेल हैं धोरणांमुळे ठेकेदाराला आर्थिक लाभ झाल्याचे चित्र आहे.
सोबलगाव ते पाडळी मधील रस्ता करण्या संदर्भात दैनिकाने सतत बातम्या द्वारे अवगत करुन पाठपुरावा केला.त्यात सोबलगाव धरण ते पाडळी दरेगाव मुख्य रस्ता पर्यंत नुकतेच रस्ता काम पूर्ण करण्यात आले.खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम करताना ५०-६०मीटर काम खडीकरण दबाई डांबरीकरण काम सोडून देण्यात आले.तर खडीकरण सोबत खडी डांबरी कामात तुरळक डांबराचा वापर करून काम आटोपते घेण्यांत आले आहे. काम पुर्ण झाल्यानंतर सद्या डांबराचा किती वापर करण्यांत आला हे घटनास्थळी स्पष्ट दिसून येईल, असे असताना विभागांचे मात्र "सभ आलबेल हैं" या धोरणांमुळे शासन जनतेच्या निधीतून ठेकेदाराला लाभ पोहचवण्याचा प्रकार स्पष्टपणे दिसून येत आहे.हे विशेष . वरिष्ठांनी कामाची चौकशी पाहणी करून नियमानुसार काम करण्याची सुचना करावी जेणेकरून ग्रामीण नागरिकांना याचा फायदा होईल व काम टीकून राहील असी मागणी नागरिकांतून करण्यात आला आहे.

## घनकचरा विलगीकरण शेड प्रकल्प कामांना वेग

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ग्रामीण भागात ठिकठिकाणी गावा गावात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत घनकचरा विलगीकरण शेड प्रकल्प कामांना वेग आल्याचे चित्र आहे. तालुक्यातील मौजे झरी येथे व वडोद खुर्द येथे घनकचरा विलगीकरण शेड प्रकल्प काम पुर्ण करण्यात आले आहे. तर वडगाव पाडळी पळसगाव व इतर ठिकठिकाणी घनकचरा विलगीकरण शेड प्रकल्प कामांनी वेग घेतला आहे. घनकचरा विलगीकरण शेड प्रकल्प अंतर्गत प्रकल्पात चारपाच हौदा सारखे लहान मोठे सिमेंट इटा प्लास्टर करुन व विविध रंगरुपात आकर्षक करुन यात काच कचरा, लेदर कचरा, दवाखान्याचा कचरा, प्लास्टिक कचरा, इले -व इलेक्ट्रॉनिक वस्तू कचरा,ओला कचरा, सुका कचरा असे विलगीकरण करण्यात आले आहे. व या प्रकल्प कामांना वेग आला आहे. सदर कामे जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत घनकचरा विलगीकरण शेड प्रकल्पाचे कामे गावागावांत वेगाय सुरु आहे.




## विवेक पालटकरची फाशीची शिक्षा कायम

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** स्वतःच्या बहिणीसह पवनकर कुटुंबातील पाच जणांची हत्या करणाऱ्या आरोपी विवेक गुलाबराव पालटकरची फाशीची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कायम ठेवली आहे. नागपूर जिल्हा व सत्र न्यायालयाने विवेक पालटकरला फाशीची शिक्षा ठोठावली होती. ही शिक्षा कायम ठेवण्यासाठी राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. दुसरीकडे आरोपी विवेक पालटकर यानेही फाशीच्या शिक्षेविरुद्ध अपील दाखल केले होते. पालटकर याचे कृत्य विकृत स्वरूपाचे आहे. अशाप्रकारचे लोक समाजासाठी विघातक आहे त्यामुळे त्याला फाशीची शिक्षा देणे गरजेचे आहे, असे मत उच्च न्यायालयाने व्यक्त केले. न्या. विनय जोशी आणि न्या. महेंद्र चांदवानी यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. आरोपी विवेकने एकाच रात्री बहीण, जावयासह पाच जणांची निर्घृण हत्या केली होती. या घटनेमुळे संपूर्ण शहरात थराकाप उडविला होता. मृतांमध्ये कमलाकर मोतीराम पवनकर (वय ४८), त्यांच्या पत्नी व विवेकची बहीण अर्चना (वय ४५), कमलाकर यांच्या आई मीराबाई (वय ७३), मुलगी वेदांती (वय १२, सर्व रा. दिघोरी) व विवेकचा मुलगा कृष्णा (वय ५) यांचा समावेश आहे.




## जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी घेतला निवडणूक पूर्वतयारीचा आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी सर्व नोडल अधिकाऱ्यांकडून निवडणूक पूर्वतयारीचा आढावा घेतला. त्या त्या विषयाच्या अनुषंगाने आज जिल्हा नियोजन सभागृहात हा आढावा घेण्यात आला. महावितरणचे सह व्यवस्थापक राहुल गुप्ता, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, अपर आयुक्त रणजीत पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर सर्व नोडल अधिकारी आदी उपस्थित होते. बैठकीत नोडल अधिकाऱ्यांच्या सोबविलेल्या जबाबदाऱ्यानुसार कामकाजाचा आढावा घेण्यात आला. त्यात आचारसंहिता, मतदान कर्मचारी व्यवस्थापन, अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, निवडणूक साहित्य मागणी- वितरण, वाहतुक व्यवस्था, संगणक कक्ष, कम्युनिकेशन प्लॅन, स्वीप, कायदा व सुव्यवस्था, मतदान यंत्र, खर्च निरीक्षण, मतपत्रिका, डमी , टपाली मतपत्रिका, मिडिया, संपर्क कक्ष, मतदार यादी कक्ष, मतदार मदत व तक्रार निवारण कक्ष, निवडणूक निरीक्षक, मतदारांना मतदान केंद्रावर द्यावयाच्या सुविधा (शहरी व ग्रामिण) मतमोजणी, वेबकास्टिंग इ. विविध विषयांनुसार आढावा घेण्यात आला.

# पीरबावडा येथे शहामिया बाबा उरुसाला प्रारंभ

## सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील पिरबावडा व आडगाव खुर्द येथील सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थानअसलेले शहामिया बाबा यांच्या उरुसास गुरुवार दि.28 रोजी संदल मिरवणूक राहील या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहेत शुक्रवार दि.29 रोजी बारागाडे ओढण्यात येतील शनिवार दि.30 रोजी कुस्त्यांचा आखाडा भरेल यासाठी दहा रुपयापासून ते पाच हजार एक रुपया पर्यंत बक्षीस ठेवलेले आहेत.

शहामिया बाबाच्या पायथ्याशी असलेल्या गावात आजही सर्वधर्मीय या ग्रामदैवताची आराधना करतात एका आख्यायिकेनुसार चौदाव्या शतकात पीरांची पालखी येथे वास्तव्यास आली त्यांचा सत्संग संपल्यावर त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी डेरा टाकला त्या सर्व पिरांचे सरदार शहामिया बाबा होते त्यांनी परिसरात पिराचा बावडा भरविला त्यांची आठवण म्हणुन बाबांच्या वस्तीला पिरबावडा असे नामकरण झाले. शहामिया बाबा दर्गे समोर धनगर बाबा ची समाधी आहे येथे प्रथम दर्शन झाल्यावर मग बाबांच्या तुर्बातीचे दर्शन घेतात.

भक्तांसाठी खास व्यवस्था

(याठिकाणी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी पाण्याची व्यवस्था ग्रामपंचायत व यात्रा कमिटी तर्फे करण्यात आली आहे.

(पिरबावडा गावाचे वैशिष्ट्य म्हणजे गावात चुना वापरत नाही किंवा घर बांधण्याकरता माती विटांचा वापर केला जात नाही जवळच असलेल्या आडगाव खुर्द या गावातही विटा मातीचे व चुना वापरुन घर काम केलं जात नाही इमारत बांधकाम करायचे असल्यास सिमेंट गट्टू किंवा ओतीव बांधकाम करण्यात येते विशेष म्हणजे मार्च महिन्यातील संकष्टी चतुर्थीला बाबांचा संदल झाल्याशिवाय कोणतेही शुभ कार्य होत नाही यात्रा संपताच विवाह चालू होतात.







# स्वीप कक्षाद्वारे मेहंदी स्पर्धेतून मतदान जागृती

आधुनिक केसरी न्यूज

**सिध्दार्थ वाठोरे**

**हदगाव :** लोकसभा सार्वत्रीक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाचे प्रमाण वाढाविण्यासाठी हदगाव स्वीप कक्षातर्फे विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. १५, हिंगोली लोकसभा मतदारसंघातील, ८४ हदगाव विधानसभा क्षेत्राचे हदगावचे उपविभागीय अधिकारी तथा सहा.निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश कांबळे तसेच तहसिलदार तथा अति, सहा. निवडणूक अधिकारी विनोद गुंडमवार यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृती चे कार्य सुरू करण्यात आले आहे. तहसील विभागातील स्वीप कक्षांचा वतिने तालुक्यातील सिबदरा तसेच चिंचगव्हान येथील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची स्वीप अंतर्गत मतददान जागृती बाबतील चित्रकला व मेंहदी स्पर्धा आयोजित करण्यात आली यामध्ये विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला व पालकांना मतदानाचे महत्व पटवून देण्यात आले व मतदान शपथ घेण्यात आली.याप्रसंगी स्पीप प्रमुख हदगाव पं.स.चे गटशिक्षणाधिकारी किशन फोले, विस्तार अधिकारी सुर्यकांत बाच्छे, श्रीमती रुक्मा कुडमुते,केंद्रप्रमुख संदेश चोंडेकर,अरविंद सूर्यवंशी,शिवाजी शिंदे,उदय देवकांबळे, दत्तात्रय पवळे, श्रीमती कराड यांच्या टिम द्वारे मार्गदर्शक करण्यात आले.

# साहेब...! मत मागायला गावात येताना प्रवास कसा झाला ते नक्की सांगा

## अविकसित रस्त्यात अडकलेला धाराशिव लोकसभा मतदारसंघ

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** लोकसभा मतदारसंघातील धाराशिव बार्शी रस्त्याची धाराशिव जिल्हा हद्दीपर्यंत खूपच दुरवस्था झाली आहे. जागोजागी खड्डे पडल्यामुळे 'रस्ता की मृत्यूचा सापळा' अशी अवस्था रस्त्याची झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रस्ता दुरुस्ती होत नसल्यामुळे प्रवाशांमधून नाराजी व्यक्त होत आहे. कळंब तालुक्याच्या हद्दीतून खामगाव ते पंढरपूर महामार्ग जातो. गेली पाच-सहा वर्षांपूर्वी या रस्त्याचं काम सुरू झालं ते अजूनही संपलेले नाही. मांजरा नदी वरील पुलाचे अर्धवट काम, कळंब तालुक्यातून बार्शीला दवाखान्यात जाण्याचं नागरिकांचे प्रमाण भरपूर त्यातच येरमाळा जवळील घाटातील रोड चे काम न झाल्याने रस्त्याची नुसती चाळण झालेली आहे.



धुळीचे लोट नाका तोंडात घेऊन या रस्त्यावरून गेली पाच सहा वर्षापासून नागरिक प्रवास करत आहेत. जागोजागी खड्डे पडल्यामुळे प्रवासी व वाहनचालकांची गैरसोय होत आहे. ईटकुर कडून धनेश्वरी बोरगाव कडे जाणारा रस्ता हा रस्ता पाहिल्यावरच आतापर्यंत किती लोकप्रतिनिधी या भागांचा विकास केला आहे. हे लक्षात येतं, वाशी कळंब तालुक्याला जोडणारे रस्ते त्यातील ईटकुर ते गंभीरवाडी यावरून दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवासी नागरिकांचे मणक्याचे आजार पणं वाढतं आहे. गंभीरवाडी ते सारोळा हा रस्ता तर मोठ्या मोठ्या खड्डेने मृत्यूचा सापळा बनत आहे. वाशी शहरापासून हाकेच्या अंतरावरील सारोळा, लिंगी पिंपळगाव रस्त्यावर डांबराचा रस्ताच दिसून येत नाही. जागोजागी दगड उघडे पडले आहेत. त्यामुळे या रस्त्यावरून चालायचे तरी कसे? असा प्रश्न पादचाऱ्यांना पडतो. तेर-जागजी रोड चे काम दोन वर्षात झालेलं आहे. तरीही रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. याविषयी उद्याचे संभाव्य लोकसभा उमेदवार काही बोलणार का? याच लोकसभा मतदारसंघातील कडकनाथ वाडी काटेगाव,आगळगाव या बार्शिला जोडणाऱ्या रस्त्यांची अवस्था आपल्याला सांगेन नेमकं विकास कुठे हरवला आहे. होणारे लोकप्रतिनिधी आता तरी धाराशिव मतदारसंघातील दळणवळणाचा मार्ग सुकर करणार आहेत. की, दुसरेच विकासाच गाजर दाखवून मताची गोळी गोळा बेरीज करणार आहेत. अश्याच संमिश्र प्रतिक्रिया मतदारसंघातील नागरिकाकडून येत आहेत.

# मराठा आरक्षणावरून तरुणाने घेतला गळफास

## सुमितचे भारतीय सैन्य दलात जाण्याचे स्वप्न राहिले अधुरे : लोहा तालुक्यातील बेरळी येथील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील बेरळी येथील इयत्ता दहाव्या वर्गात



शिक्षण घेणारा कुमारवयीन तरुणाने मराठा आरक्षण मिळत नसल्यामुळे नैराश्यातून स्वतःच्या शेतातील पत्र्याच्या शेड ला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना दि. २७ रोजी सकाळी साडे दहा ते अकरा वाजताच्या सुमारास बेरळी येथे घडली. सुमित हा शिक्षण घेवून भारतीय सैन्य दलात भरती होण्याचे स्वप्न उराशी बाळगून होता. त्याचे सैन्य दलातील जवान होण्याचे स्वप्न अधुरेच राहिले.

लोहा शहरापासून जवळच असलेल्या बेरळी (खू) येथील ढेंब्रे कुटुंबीय हे अल्प भूधारक असून मिळेल ते काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मयत सुमित शरद ढेंबरे (वय १५) याचे वडील हे नांदेड येथील बोअरवेल च्या गाडीवर काम करतात. तर आई गृहणी आहे. कुटुंबात सुमित आणि एक बहिण असा परिवार आहे. सुमितचा परिवार लोहा येथे भाड्याच्या घरात वास्तव्यास आहे. दि. २७ रोजी सुमित अंघोळ न्याहारी करून गावाकडे जातो असे सांगून घराबाहेर पडला. त्यानंतर कांहीं वेळातच सुमितची दुर्दैवी घटना कानावर पडली. सुमित हा सकाळी दहा वाजताच्या सुमारास बेरळी शिवारात असलेल्या स्वतःच्या शेतातील पत्र्याच्या शेडवर गेला. कांहीं वेळाने गावातीलच भावकितील शेजारी शेतकरी शेताकडे जात असताना त्याच्या निदर्शनास सुमित ने पत्र्याच्या शेडला गळफास लावल्याचे दिसून आले. त्याने अरडा ओरड करत सदर घटना ढेंबरे कुटुंबीयांना कळवली. घटना समजताच नातेवाईक, पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्याने बाजूला असलेल्या फरशीवर कसल्यातरी नोकदर वस्तूने असे लिहलेले आढळून आले की, मी मराठा आरक्षण लढ्यासाठी आत्महत्या करत असून मराठा समाजास आरक्षण मिळत नाही. माझी भारतीय सैन्य दलात जाण्याची इच्छा होती. असे असले तरी ताई तू डॉक्टर हो.. एक मराठा लाख मराठा. असे लिहून त्याने गळफास घेतला असल्याचे सांगण्यात आले. सदरील घटनेप्रकरणी लोहा पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पो. नि. ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस उपनिरीक्षक बगाडे हे करत आहेत. शासकीय उपजिल्हा रुग्णालयात मंडळ अधिकारी श्रीमती नाशिककर यांनी भेट दिली. तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांनी शव विच्छेदन केले. दुपारी बेरळी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात सुमितच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आला.

# प्रतिबंधात्मक कारवाई महसूल-पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे राबवावी : जिल्हाधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** लोकसभा निवडणुकीच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते. तथापि, ही कारवाई करतांना महसूल आणि पोलीस प्रशासनाची संयुक्त जबाबदारी आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले. जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आज लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने करावयाच्या प्रतिबंधात्मक कारवाईचा आढावा घेण्यासाठी महसूल व पोलीस प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांची संयुक्त आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, पोलीस उपअधीक्षक विजय पाटील सर्व उपविभागीय,तहसील कार्यालयातील, पोलीस स्टेशन मधील अधिकारी यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, कायद्याने दिलेल्या अधिकाराचा सुयोग्य वापर करून कोणावरही अन्याय होईल असे वर्तन पोलीस प्रशासन किंवा महसुल दंडाधिकारी कार्यालयाकडून होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. प्रतिबंधात्मक कारवाईमध्ये कारणे दाखवा नोटीस बजावणे आवश्यक असुन यात उपविभागीय व तालुकादंडाधिकाऱ्यांनी खात्री करणे आवश्यक आहे. कलम १४४ अंतर्गत येणाऱ्या कारवाईत तातडीने आपल्या हद्दीतील आदेश निर्गमित करण्यात यावेत. गुन्हेगारांबाबतची स्थानिक पातळीवर माहिती घेण्यात यावी. निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन आणि महसूल प्रशासनाची ही संयुक्त जबाबदारी आहे. त्यासाठी त्यांनी परस्पर समन्वय राखावा. आपले कर्तव्य बजावण्यात कुचराई करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.




# समाजमनाचा ठाव घेणारी कविताच उत्तम मानली जाते : प्रा. डॉ. सतीश मस्के

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** कविता लिहिणे अवघड गोष्ट आहे. कुणालाही ती लिहिता येत नाही. समाजाच्या नानाविध अनुभवांचे सूक्ष्म निरीक्षण करून ज्याला कविता लिहिता येते तोच उत्तम कमी होतो. असे मत प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी म्हस्दी येथील महाविद्यालयात नवोदित कवीसाठी काव्यलेखन कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी मांडले.समारोपाच्या अध्यक्षस्थानी कवी ॲड. विलास मोरे हे होते. विचारमंचावर प्रा. डॉ.संजीव गिरासे, प्रा. डॉ .वाल्मिक आढावे आधी मान्यवरांची उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे, स्व. अण्णासाहेब आर डी देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय नवोदित कवींसाठी काव्यलेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी प्रा.डॉ. सतीश मस्के यांनी नवकवींना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की,मानसिक आंदोलनाला शब्दातून व्यक्त करणारा शब्दसमूह म्हणजे कविता होय. मनाचे अंतरंग उलगडत असताना समाज मनाचा ठाव घेणारी कविता उत्तम मानली जाते. मानवी मनाचे विविध कंगोरे तरल भाव कविता व्यक्त करते. तसेच या कार्यशाळेत सहभागी झालेल्या नवकवींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. समारोप समारंभाचे सूत्रसंचालन कार्यशाळेचे समन्वयक डॉ. मिलिंदकुमार देवरे यांनी केले तर आभार डॉ. विठ्ठल साळुंखे यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी स्वयंसेवक रोहित नेरे, समाधान देवरे, तेजस नेरे, सायली पाटील, रोहिणी देवरे, प्रांजली देवरे, वैष्णवी अहिरे यांनी परिश्रम घेतले. शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# क्षयरोग निर्मूलनासाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा जिल्हा परिषदेत सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत 2025 पर्यंत क्षयरोग मुक्त भारत करण्याच्या उद्देशाने चालु असलेल्या मोहिमेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आरोग्य विभागातील 2023-2024 या वर्षात उत्कृष्ट काम करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांचा सत्कार वेरूळ सभागृह जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथे पार पडला, सहसंचालक आरोग्य सेवा महाराष्ट्र शासन डॉ. भुषण रामटेके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अभय धानोरकर,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.गणेश कल्याणकर, जिल्हा आरसीएच अधिकारी डॉ विशाल बेंद्रे,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ प्रशांत बडे या मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गौरविण्यात आले. त्यामध्ये खुलताबाद तालुक्यातील तालुका आरोग्य अधीकारी डॉ. किरण शिंदे, वैद्यकीय अधिकारी शाहनाज अन्सारी, डॉ. पुराणिक, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.रमेश शेळके डॉ.वैभव बविस्कर, क्षयरोग पर्यवेक्षक राजकुमार दुर्गे, आरोग्य सेवक सुनील जाधव, आशा परवीन शेख, मीरा सोनवणे, कांता काळे इ कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.





# भारतीय जनता पार्टीतर्फे 21 हजार 'नमो संवाद' सभांचे आयोजन

## भाजपा प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पार्टीतर्फे राज्यात स्टार प्रचारकांच्या सभांबरोबरच पक्ष संघटनेच्या शक्ती केंद्र पातळीवरील 21 हजार 'नमो संवाद' सभांचे आयोजन केले जाणार आहे. 'नमो संवाद' सभांच्या माध्यमातून भाजपा चे 1 कोटी मतदारांपर्यत पोहोचण्याचे लक्ष्य आहे, अशी माहिती भाजपा प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी बुधवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत पाटील बोलत होते. प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान यावेळी उपस्थित होते. 2014 पूर्वीचा भारत आणि आत्ता मोदी सरकारच्या काळात घडलेल्या नवभारताचे तुलनात्मक चित्र सर्वसामान्य जनतेसमोर मांडण्याचा प्रयत्न या दरम्यान केला जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले . पाटील यांनी सांगितले की, लोकसभा निवडणुकीच्या प्रचार मोहीमेत राष्ट्रीय आणि प्रदेश पातळीवरील अनेक महत्वाचे नेते सहभागी होतील. त्याच्या बरोबरीने जास्तीत जास्त मतदारांपर्यंत थेट पोहोचण्यासाठी 'नमो संवाद' सभांचे आयोजन केले जाणार आहे. मतदानाच्या टप्प्यांनुसार या 'नमो संवाद' सभांचे वेळापत्रक बनवण्यात येणार आहे. 21 हजार शक्ती केंद्रांवर होणा-या या सभांमध्ये ३०० पेक्षा अधिक वक्ते सहभागी होणार असून दररोज 7 ते 8 सभा होणार असल्याचे श्री.पाटील यांनी नमूद केले.ते म्हणाले की, भाजपाचे विविध मोर्चे व प्रकोष्ठ यांच्या माध्यमातून फेरीवाले, व्यापारी, शिक्षक अशा समाजातील विविध घटकांशी संवाद साधण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत.ग्रामीण भागामध्ये 'नमो चौपाल' तर युवा पिढीशी संवाद साधण्यासाठी 'कॉफी विथ युथ' असे कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

# दुरवस्था झालेले विद्युत खांब मृत्युदूत बनण्याची शक्यता

## रस्त्याच्या मधोमध खांबांचा विकास कामात अडथळा

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा दुर्लक्षितपणा आता सर्वसामान्यांच्या जीवावर उठू पाहत आहे. तालुक्यातील गणेशपुर (पाचंबा) येथील गावावस्तीत असलेल्या बऱ्याच विद्युत खांबांची दुरावस्था झालेली असून सदर खांब केंव्हाही मृत्यूदूत बनण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर रस्त्याच्या मधोमध उभे असलेले खांब गावातली विकास कामात अडथळा निर्माण करीत आहेत. याबाबत येथील ग्राम पंचायतने अनेक वेळा लेखी पाठपुरावा करून सुद्धा वीज वितरण कंपनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. याची त्वरीत दखल न घेतल्यास गावकऱ्यांनी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

गणेशपुर गावातील बरेच विद्युत खांब जमिनीलगतच्या तळाशी जीर्ण झाले आहेत.तर काही खांबांना तडे गेले आहेत. असे दुरावस्था झालेले धोकादायक खांब कधीही मृत्यूदूत बनू शकतात अशी भीती ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. जीर्ण अवस्थेतील विद्युत खांब आणि त्यावरील सैल झालेल्या विजेच्या तारा वाऱ्याबरोबर हेलकावे घेत असल्याचे चित्र येथे पहावयास मिळत आहे. अनेक वर्षापूर्वी उभे केलेले खांब जमिनीलगतच्या तळाशी गंजून खराब झाले आहेत. तर काही सिमेंटच्या खांबांना तडे गेले आहेत. नागरी वस्तीत असलेले हे खांब कधीही उन्मळून पडू शकतात त्यामुळे गावकरी सदर खांबाजवळून जाता, येता दहशतीखाली वावरत आहेत. या बाबत येथील ग्राम पंचायतने रिसोड येथील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाकडे अनेक वेळा लेखी स्वरूपात पाठपुरावा केला आहे. मात्र प्रत्येक वेळी सदर कार्यालयाने गावकऱ्यांच्या मागणीस केराची टोपली दाखवली आहे. वीज वितरण कंपनीचा हा दुर्लक्षितपणा एक दिवस कोणाच्यातरी जीवावर बेतनार अशा संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. तद्वतच रस्त्याच्या मधोमध उभे असलेले खांब गावातील अनेक विकास कामात अडथळा निर्माण करीत आहेत. त्यामधे पाणी पुरवठ्याची पाईप लाईन असो वा सदर रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिट करणे असो अशा विकास कामाचा खोळंबा होत आहे. त्या अनुषंगाने येथील महीला सरपंच शोभा विजय जाधव यांनी जीर्ण झालेले धोकादायक खांब व रस्त्यात अडथळा निर्माण करणारे खांब बदलून देण्यासाठी वीज वितरण कार्यालयाकडे डिसेंबर २०२३ आणि जानेवारी, फेब्रुवारी २०२४ असा सलग पाठपुरावा केला आहे. परंतू अद्यापही संबंधित कार्यालयाने दखल घेतली नाही. मात्र आता संयमाचा बांध फुटला असून ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

**पावसाळ्यापूर्वी जलद गतीने काम करणे गरजेचे .**
तालुक्यातील अनेक गावात अशा समस्या निर्माण झाल्या आहेत . तर काही शेताशिवारात देखील विद्युत खांब झुकलेल्या अवस्थेत तग धरून उभे आहेत . तद्वतच काही ठिकाणी वीज वाहुन नेणाऱ्या तारांमधे झाडांच्या फांद्या घुसलेल्या आहेत . या सर्वच समस्या आसपास काम करणाऱ्यांसाठी धोकादायक आहेत . कसलीही अप्रिय घटना घडण्याची वाट न पाहता वीज वितरणने पावसाळ्यापूर्वी जलद गतीने सदर कामांची दुरुस्ती कारणे खुप गरजेचे आहे .



आकोडे टाकून वीज चोरीचे प्रकार रोखण्यासाठी वीज वितरणने संपुर्ण गावात केबालिंग केले आहे . मात्र पूर्वीच्या विद्युत तारा आजही झोपळ्या सारख्या झुलत आहेत . त्यामुळे थोडा जरी सोसाट्याच्या वारा आला तर, दुरावस्था झालेले खांब आसपासच्या घरावर कोसळल्याशिवाय राहणार नाहीत . यात जीवीतहानी होण्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही . या गंभीर बाबीची संबंधितांनी त्वरीत दखल घ्यावी . **विष्णु जाधव, (ग्रामस्थ, गणेशपुर, पाचंबा, ता .रिसोड)**



# बाबरा येथे ड्राय डेच्या दिवशी दारू विक्री करणाऱ्या महिलेवर पोलिसांची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोदबाजार पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या बाबरा येथे दि 25 रोजी धुलीवंदनाच्या दिवशी ड्राय डे असताना अडाणी गल्लीत राहणाऱ्या ललिता राजेंद्र महाजन या राहत्या घरात ाावेधरित्या दारू विक्री करत असताना पोलिसांना मिळून आल्याने त्याच्या विरुद्ध वडोदबाजार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
याबाबत सविस्तर माहिती अशी की दि 25 रोजी पोलीस हेडकोन्स्टेबल शंकर चव्हाण,पोलीस अंमलदार दत्ता मोरे,पोलीस नाईक दराडे,गांवडे आदी पोलीस कर्मचारी हे बाबरा हद्दीतमध्ये ाावेध धंध्ये विरुद्ध कारवाई साठी निघाले असता ते बाबरा येथील शिवाजी महाराज पुतळ्याजवळ आले सायंकाळी 5 वाजेच्या सुमारास आले असता बाबरा येथील अडाणी गल्लीत राहणाऱ्या ललिता राजेंद्र महाजन या आपल्या स्वतःच्या राहत्या घरात विनापरवाना दारू विक्री करत असल्याची माहिती खबऱ्या मार्फत पोलिसांना मिळाली असता त्यांनी पंच व महिला कर्मचारी याना कारवाई साठी बोलावले व माहिती मिळाल्या ठिकाणी पोलीस पोहचले असता त्या ठिकाणी ललिता राजेंद्र महाजन वय 42 वर्षे याना विनापरवाना विदेशी दारू विक्री करताना ताब्यात घेतले व त्याच्या जवळून मॅक डॉल नंबर 1 च्या 13 बाटल्या,तर 90 एम एल च्या 3 बाटल्या,तर एमपरील ब्ल्यू नावाच्या 4 बाटल्या,तर आयकोनिया 4 बाटल्या गोवा जीन च्या 3 बाटल्या ऑफीसर चॉईस च्या 90 एम एल च्या 3बाटल्या असा एकूण सात हजार तीनशे दहा रुपयांचा मुद्देमाल पोलिसांना मिळून आला असून त्यांनी आरोपी महिला विरुद्ध महाराष्ट्र दारू बंदी कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे,सदरील कारवाई सहायक पोलिस निरीक्षक सुनील इंगळे याच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. भगवा महाराष्ट्र न्यूज छत्रपती संभाजी नगर

# भागवत म्हणजे वेदरुपी वृक्षाला आलेले गोंडस फळच

## भागवताचार्य श्री अंकुश महाराज जगताप

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** येथील संत तुकाराम महाराज मंदिरात तुकाराम बीजेच्या निमित्ताने भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप यांच्या सुश्राव्य वाणीतून सात दिवशीय आयोजित श्रीमद भागवत कथेची मंगळवारी दि.२६ मार्च रोजी सायंकाळी भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.भागवत म्हणजे वेदरुपी वृक्षाला गोंडस आलेलं फळ असून भागवत कथा श्रवणाने मनुष्य जीवाचा उद्धार करा असे आवाहन भागवताचार्य श्री अंकुश महाराज जगताप यांनी यावेळी बोलताना केले.

नेवासा येथील जगदगुरू संत श्री तुकाराम महाराज मंदिरामध्ये तुकाराम बिजोत्सवाच्या निमित्ताने महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली संत तुकाराम महाराज मंदिराचे विश्वस्त भागवताचार्य हभप श्री अंकुश महाराज जगताप यांच्या सुश्राव्य वाणीतून भागवत कथा दुपारच्या सत्रात पार पडली

कथेच्या सांगता प्रसंगी बोलतांना भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप म्हणाले की आपल्या सर्वांचे श्रद्धास्थान वाणीभूषण हभप श्री उध्दवजी महाराज मंडलिक बाबांनी माझ्यासारख्या



सेवेकऱ्याला याठिकाणी सेवा करण्याची संधी दिली म्हणून आज सदगुरू श्री नारायणगिरीजी बाबा,गुरुवर्य बन्सीबाबा,व वैकुंठवाशी एकनाथ स्वामी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व हभप महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबा व महंत श्री उध्दवजी महाराज मंडलिक बाबा यांच्या मार्गदर्शनामुळे वारकरी संप्रदायाचे वैभव आता वाढू लागले आहे असल्याचे सांगितले. भागवत हे वेदरुपी वृक्षाचे गोंडस फळ आहे, भागवत कथा श्रवणाने व पठणाने मनुष्याची जन्मोजन्मीच्या पापे ही नष्ट होतात व मनुष्य जीवाचा उद्धार ही होतो त्यामुळे भागवत कथेचे पदमपुराण व कंदपुराणाने देखील वर्णन केले असून भागवत श्रवणाने मनुष्याबरोबरच भूत प्रेतांचा ही उद्धार होतो त्यामुळे जीवनात कधी तरी भागवत कथा श्रवण करा, असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले.

संगीतमय भागवत कथेसाठी गायनाचार्य गणेश महाराज गोंडे,ऍक्टोपॅड-विष्णू महाराज घुणे,कि बोर्ड-दत्ता महाराज तापकिरे,तबला-श्रीकांत महाराज पाटील यांनी उत्कृष्ठ संगीतसाथ देत भागवत कथेला रंगत आणली त्यामुळे कथा श्रवणासाठी आलेला प्रत्येक भाविक हा मंत्रमुग्ध झाला होता. या कथेसाठी साथ देणाऱ्या वादक मंडळीचा भक्त परीवाराच्या वतीने रखमाजी नाचन, गोरक्षनाथ पठाडे, दशरथ मुंगसे, नंदूभाऊ गायके यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी अनेकांनी भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप यांचे संतपूजन केले उपस्थित महिला भाविकांनी पंचारती ओवाळून सांगता प्रसंगी झालेल्या भागवताच्या आरतीला सहभाग नोंदवला. यावेळी अगस्ती आश्रमाचे सेवेकरी भानुदास महाराज भिसे, देवी कथाकार हभप सौ.साधनाताई मुळे, आर. बी. गायकवाड, प्रा.रामनाथ नन्नवरे यांच्यासह बाल वारकरी महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# ब्रिलियंट स्कूलमध्ये महिला आरोग्य शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** महिला दिन व स्वयंसिद्धा बचत गटाच्या प्रथम वर्धापन दिनाचे औचित्य साधून पारगाव-खंडाळा येथील ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये महिला आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. महिलांच्या सहभागाने हे आरोग्य शिबी संपन्न करण्यात आले. डॉ. रेणूका पाटील यांच्या तर्फे अंकूरा हॉस्पिटल प्रा.लि. पुणे येथील तज्ञ डॉ.पल्लवी कोतवाल यांना बोलवण्यात आले होते. यावेळी सर्व वयोगटातील महिलांना , किशोरवयीन मुलींना, येणाऱ्या शारिरीक समस्या, मासिक पाळीतील समस्या, गर्भधारणेच्या काळात येणाऱ्या समस्या,आहार विषयी मार्गदर्शन तसेच आनंदी जीवनाचा मार्ग याबाबत तज्ञ डॉ.पल्लवी कोतवाल यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.स्वयंसिद्धा महिला बचत गटामार्फत या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील सर्व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. पुणे येथील सुप्रसिध्द अंकुरा हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार किशोरवयीन मुलींच्या बाबतीत येणाऱ्या शंका तसेच समस्या, आणि त्यावरील उपचार याबाबत ही मार्गदर्शन मिळाले.सुप्रसिद्ध तज्ञ डॉ.सुप्रिया पुराणिक यांच्याकडील पहिली तपासणी मोफत व सोनोग्राफी मोफत करु अशी ग्वाही दिली. खंडाळा आणि परिसरातल्या अनेक महिला,मातापालक, किशोरवयीन मुली यांनी या संधीचा लाभ घेतला.याप्रसंगी स्वयंसिद्धा महिला बचत गटाच्या अध्यक्षा धनश्री चव्हाण, उपाध्यक्षा सायली मोहिते, सचिव स्नेहल खरात, सहसचिव डॉ.रेणूका पाटील तसेच सर्व सभासद उपस्थित होते.स्वयंसिद्धा महिला बचत गटाच्या वतीने अनेक सामाजिक कार्यक्रम, शैक्षणिक दृष्ट्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्याने,महिलांच्या व्यावसायिक विकासाच्या दृष्टीने आर्थिक मदत तसेच वेळोवेळी निरनिराळ्या विषयांसाठी मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे बचत गटातील महिला सभासदांना आर्थिक विकास होण्यासाठी मदत झाली आहे.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि आर्थिक उन्नतीसाठी यापुढे प्रयत्न करण्याची मानसिकता असल्याचे सर्व सभासदांचे ध्येय असल्याचे सचिव स्नेहल खरात यांनी सांगितले.तसेच भविष्यात आणखी काही बचतगट स्थापन करुन गरजू महिलांना मदत होईल.असे अनेक प्रकल्प सुरू करण्याचा मानस असल्याचे अध्यक्षा धनश्री चव्हाण यांनी सांगितले.

# फत्तेपूर परिसरात अवैध धंद्यांविरोधात पोलिसांची धडक मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** फत्तेपूर परिसरात अवैध गावठी हातभट्टी दारूचा महापूर सुरु आहे. प्रत्येक गांवात अवैध गावठी दारू उघड्यावर खुलेआम मिळत आहे. एका प्लॉस्टीक पिशवीमध्ये गावठी दारु टाकून तीपन्नीग्राहकांच्या हातात दिली जाते. ग्राहक सार्वजनिक ठिकाणी पन्नीमधील गावठी दारू पिवून ती पन्नी खुलेआम फेकून देतात. सार्वजनिक स्वच्छतागृहामध्ये, रस्त्यांच्या कडेला या पन्नी च्या थैल्या फेकलेल्या दिसतात. याला कोणी ही आळा घालणार नाही का? अशी मागणी महिलासह प्रत्येक गांवातील ग्रामस्थ करीत आहे. वरिष्ठांच्या सुचनेनुसार फत्तेपूर पोलीस स्टेशनचे नवनिर्वाचित सहा.पो.नि.गणेश फड यांनी स्वतः पथक तयार करून अवैध गावठी हातभट्टी दारूच्या विरोधात विशेष मोहिम हाती घेतलेली आहे. दि.२४/३/२४ मार्च रोजी सकाळी च अवैध गावठी दारु विरोधात छापेमारी केली असता त्यात दोघां विरुद्ध कारवाई करून गुन्हे दाखल केलेले आहे.ही मोहिम यापुढे ही सुरु ठेवणार असल्याची माहिती सहापोनि गणेश फड यांनी दिली. फत्तेपूर शिवारात कांग नदीच्या पात्रात येथील सुनिल पांडूरंग पारधी (वय ४२) हा गैरकायदा तीन दगडाच्या चुलीवर-नवसागर व गुळ यांचे कच्चे रसायनपासून गावठी दारू तयार करतांना मिळून आला. त्यांच्या जवळ सहा हजार रुपये किंमतीचे -४६५ लिटरचे कच्चे रसायन, उकळते रसायन, गावठी दारू बनविण्या साठी लागणारे साहित्य पोलीसांनी जप्त करुन कच्चे रसायन जागेवरच नष्ट करण्यात आले. याच कांग



नदीच्या पात्रात दुसऱ्या अड्ड्यावर धाड टाकली तडवी (वय ३१) हा सुद्धा गैरकायदा गावठी दारु तयारकरताना मिळून आला. त्यांच्या जवळ-८ हजार पाचशे रुपयांचे ६७० लिटर कच्चे रसायन व दारू तयार करण्याचे साहित्य जप्त करण्यात आले. जागेवरच कच्चे रसायन नष्ट करण्यात आले.दोघांकडून-११३५ लिटर्स कच्चे रसायन नष्ट केलेले आहे.या बाबत पोकॉ- विशाल रामदास पांढरे यांनी. दोघां विरुद्ध दिलेल्या फिर्यादी वरून फत्तेपूर पोलीस स्टेशनला दोघे आरोपी विरुद्ध मुंबई दारुबंदी कायदा कलम- ६५ (फ), (ब), (क), (ई), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. येथील सहा.पो.नि.गणेश फड यांनी स्वतः जावून गावठी दारु अड्ड्यावर छापेमारी केलेली आहे. त्यांच्यासोबत पोहेकॉ प्रवीण चौधरी, पोकॉ मुकेश पाटील आदी होते यानंतरही गावठी दारु विरोधात धाडसत्र सुरु राहणार असल्याची माहिती सहा.पो.नि. गणेश फड यांनी दिली.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# न्यायालयाच्या इमारतीचे 29 रोजी भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहराचे मध्यवर्ती ठिकाणी दिवाणी व फौजदारी न्यायालयाची निजामकालीन ऐतिहासिक अशी वास्तू होती, जिच्या बांधकामाला सुमारे 100 वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेला होता. ज्यामुळे सदरची इमारत ही जीर्ण व धोकादायक स्थितीत आल्यामुळे शासनाचे वतीने सदरची इमारत पाडण्याबाबतचा निर्णय होऊन पाडण्यात आली असून या जागी भव्य व प्रशस्त अशी न्यायालयासाठी नवीन इमारत उभी राहत आहे. त्याबाबतच्या सर्व शासकीय बाबी पूर्ण झालेल्या असून त्यासाठी शासनाकडून निधी देखील प्राप्त झाला असून कामास सुरुवात देखील लवकरच होणार आहे. सदर नूतन इमारतीचे



भूमिपूजन सोहळा अर्थात कोनशिला समारंभ हा दिनांकः 29 मार्च 2024 शुक्रवार रोजी सकाळी 11.00 वाजता मा. न्यायमूर्ती रवींद्र विठ्ठलराव घुगे उच्च न्यायालय, मुंबई ,यांचे शुभ हस्ते तसेच मा. न्यायमूर्ती संजय आनंदराव देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून श्रीमती विभा प्रभाकरराव इंगळे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. सदर कार्यक्रमास कन्नड तालुक्यातील सुजाण नागरिकांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे नम्र आवाहन कन्नड न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश प्रमोद माणिक कोळसे व कन्नड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. कृष्णा पाटील जाधव यांचे वतीने करण्यात आलेले आहे.

# संतश्रेष्ठ तुकोबांच्या त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी वैकुंठगमन सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या वैकुंठ गमनाला सन २०२४ - २५ दरम्यान ३७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने निफाड तालुक्यातील भरवसफाटा येथे मंगळवार दि.२ एप्रिल ते मंगळवार दि. ९ एप्रिल २०२४ या कालावधीत जगद्गुरु तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी वैकुंठगमन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्त संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मोरे, भानुदास महाराज मोरे, माणिक महाराज मोरे, साधू, संत, महंत, कीर्तनकार, प्रवचनकार, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत व भक्तिमय वातावरणात धर्म ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला.

दि.२ एप्रिल पासून सुरु होणाऱ्या सोहळ्यात नियमित पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ६ ते ८ तुकोबाराय पादुका पंचमान अभिषेक व विष्णू सहस्रनाम, ७ ते १२ संगीतमय पारायण, दुपारी ३ ते ५ तुकोबाराय जीवनचरित्र गाथा, सायं ५ ते ६ हरिपाठ, नियमित रात्रौ ६ ते ८ जाहीर हरिकीर्तन, रात्रौ ८ ते १० महाप्रसाद, रात्रौ १० ते ४ भजन असे कार्यक्रमाचे नियोजन आहे. मंगळवार दि. २ एप्रिल सकाळी १० ते १२ नर्मदामैया सेवक




ज्ञानेश्वर माउली शिंदे यांचे कीर्तन, सायं ६ ते ८ ज्ञानेश्वर माउली कदम यांचे कीर्तन, बुधवार दि.३ एप्रिल सायं ६ ते ८ आचार्य अर्जुन गुरुजी लाड, गुरुवार दि.४ एप्रिल सायं ६ ते ८ बंडातात्या कराडकर, शुक्रवार दि.५ बापूसाहेब महाराज देहूकर, शनिवार दि ६ चैतन्य महाराज देगलूरकर, रविवार दि ७ जयवंत महाराज बोधले, सोमवार दि. ८ एप्रिल ज्ञानेश्वर माउली कदम, मंगळवार दि ९ सकाळी १० ते १२ एकनाथ महाराज सदगीर यांचे पूजेचे कीर्तन, सायं ४ ते ६ ज्ञानेश्वर माउली कदम यांचे जाहीर हरी कीर्तन होणार आहे.

महाराष्ट्रात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात हा कार्यक्रम होणार असल्याने भाविकांनी मोठ्या संख्येने यात सहभाग नोंदवावा असे आवाहन श्री जगद्गुरु तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृत महोत्सव सदेह वैकुंठगमन सोहळा समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे.

अखंड हरिनाम सप्ताह व संगीत गाथा पारायण सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्ये :- भारतातील प्रमुख चार पिठाचे जगद्गुरु शंकराचार्य यांना या कार्यक्रमासाठी निमंत्रित, श्री जगद्गुरू तुकोबाराय भव्यदिव्य आठ दिवशीय कृषी प्रदर्शन, प्रतिदिन ५० मृदंगवादक, नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यातील १ आदर्श कीर्तनकारास पुरस्कार, ३७५ युवकांच्या हस्ते संतश्रेष्ठ तुकोबाराय दिव्यज्योत आगमन, ५०० टाळकरी प्रतिदिन, नियमित ५००० गाथा वाचक, संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या पादुका हेलिकॉप्टरने जिल्ह्यात, २४ तास तुकाराम नावाचा अखंड भजन पहारा गजर, दररोज ५० हजार भाविकांचे अन्नदान करण्याचे उद्दिष्ट, गुढीपाडव्याच्या शुभ पर्व काळात १ लक्ष भाविकांना मांडे जेवण.

# ऊसतोड मजुरांच्या झोपड्यांना आग

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** उदगाव, (ता. शिरोळ) येथील माळावरील श्री उदयसिध्द बिरोबा मंदिराच्या समोर असलेल्या ऊसतोड मजूराच्या झोपड्यांना मंगळवारी रात्री आग लागली. या भीषण आगीत पाच झोपड्या बेचिराख झाल्या. त्यातील सर्व प्रापंचिक साहित्य जळून खाक झाले. यात एक शेळी भाजुन जखमी झाली आहे. इतर जनावरे व ट्रॅक्टर बाजुला केल्याने अन्य नुकसान टळले.जयसिंगपूर पालिका व शिरोळ दत्त कारखान्याच्या अग्निशमन दलाने आग अटोक्यात आणली. शिरोळ तालुकयातील ऊसाचा हंगाम अजुन दोन दिवस चालणार आहे. त्यामुळे ऊसतोड मजूर आपल्या गावाला जाण्याच्या तयारीत आहेत. मंगळवारी रात्री महिला जेवण करीत असताना एका झोपडीला आग लागली. वारा सुटल्याने एका झोपडीला लागलेली आग दुसऱ्या झोपडीला त्यानंतर अन्य तीन झोपड्यांना लागली.

आग लागल्यानंतर ऊसतोड मजूरांनी जनावरे व लगत असलेले ट्रॅक्टर व अन्य वाहने बाजुला केली. यावेळी झोपड्यांमध्ये असलेल्या गॅस टाकीला मोठी आग लागल्याने 1 टाकीतून आगीचे लोट जात होते. घटनास्थळी परीसरातील नागरीकांनी धाव घेवून पाण्याचा मारा सुरू केला. जयसिंगपूर पालिका व शिरोळ दत्त कारखान्याच्या अग्निशमक दलाला पाचारण केले. त्यानंतर अग्निशमक दलाने आग आटोक्यात आली. यात पाच झोपड्यामधील अन्न, धान्य, कपडे सर्व प्रापंचिक साहित्य जळून झाले. एक शेळी या आगीत भाजली गेली आहे.

# सकाळचे संदीप काळे व डॉ. अभिजित सोनवणे यांना पुरस्कार जाहीर

## भोकर सेवा समर्पण परिवाराचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील सेवा समर्पण परिवाराच्या वतीने देण्यात




येणा-या पत्रकारिता राज्यस्तरीय पुरस्कार "सकाळ" समूहाचे संपादक संदीप काळे व डॉ. अभिजित सोनवणे यांना समाजसेवा पुरस्काराची घोषणा मंगळवारी (ता. २६) अध्यक्ष राजेश्वर रेड्डी लोकावाड, सचिव विठ्ठल फुलारी यांनी केली आहे.

सेवा समर्पण परिवाराच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त मागील दोन वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जोपसणाऱ्यांना पुरस्कार दिला जातो. यावर्षी सकाळ समूहाचे संपादक तथा व्हाइस ऑफ मीडिया चे संस्थापक संदीप काळे यांना राज्यस्तरीय पत्रकारिता सेवा समर्पण पुरस्कार तर सामाजिक काम करणारे डॉ अभिजित सोनवणे यांना राज्यस्तरीय समाजसेवा सेवा समर्पण पुरस्कार देण्यात येणार आहे.

या पुरस्काराचे स्वरूप रोख ११ हजार, मानपत्र, सन्मानचिन्ह असे राहणार आहे. पुरस्कार वितरण सोहळा सोमवारी (ता.३१) सकाळी ११:३० वाजता शहरातील माऊली मंगल कार्यालय येथे जेष्ठ साहित्यिक दत्ता भगत, उपमुख्यमंत्री कार्यालयातील अव्वर सचिव राजेंद्र खंदारे, उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, अप्पर पोलिस अधीक्षक डॉ खंडेराव धरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. रविवारी (ता३०) माऊली मंगल कार्यालय येथे रक्तदान शिबीर होणार असून या शिबिराचे उद्घाटन तहसीलदार सुरेश घोळवे करणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ .पंजाब चव्हाण, प्राचार्य संजय देशमुख, मुख्याधिकारी मारोती जगताप यांची उपस्थिती राहणार आहे. शूक्रवारी (ता.२९) नागापूर (ता. भोकर) येथे नेत्ररोग शिबिर आयोजित करण्यात आले आहे.या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सेवा समर्पण परिवार च्या वतीने करण्यात आले आहे.

# संजय देशमुख यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** शिवसेना (उबाठा)चे संजय देशमुख हे यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार राहतील, हे बुधवारी अधिकृतपणे स्पष्ट झाले. शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज राज्यातील १६ उमेदवारांची घोषणा केली. त्यात यवतमाळ – वाशीम लोकसभा मतदारसंघातून संजय देशमुख यांना संधी मिळाली आहे. संजय देशमुख हे पहिल्यांदाच लोकसभा निवडणुकीस सामोरे जात आहेत. संजय देशमुख यांची राजकीय कारकीर्द ही शिवसेनेतून सुरु झाली असली तरी ते अपक्ष म्हणून राजकारणात सक्रिय झाले. १९९९ आणि २००४ मध्ये त्यांनी अपक्ष आमदार म्हणून दिग्रस विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. १९९९ मधील राजकीय समीकरणांत अपक्षांनी आघाडीला पाठिंबा देवून मंत्रीपदे पारड्यात पाडून घेतली होती. त्या मोहिमेचे नेतृत्व विदर्भातील दोन आमदारांनी केले, त्यात संजय देशमुख आघाडीवर होते. पहिल्यांदाच आमदार बनलेले संजय देशमुख त्या वाटाघाटीत थेट राज्यमंत्री झाले. तेव्हापासून संजय देशमुख यांचा राजकीय उत्कर्ष मतदारसंघाने पाहिला. राज्यमंत्रीपदानंतर अल्पावधीतच ते शिक्षण सम्राट म्हणूनही नावारूपास आले. २००८ मध्ये मतदारसंघ पुनर्ररचेनंतर दिग्रस विधानसभा मतदारसंघाची मोडतोड झाली. त्यानंतर मात्र या मतदारसंघात शिवेसेनेचे संजय राठोड यांनी वर्चस्व मिळविले ते अद्यापही टिकून आहे. २००९ नंतर दिग्रस मतदारसंघात संजय देशमुख यांची राजकीय पकड सैल झाली. त्यांनी कायम पक्षबदल केले. काँग्रेसमध्येही ते पदाधिकारी राहिले. काँग्रेसकडून दिग्रस विधानसभा मतदारसंघात निवडणूकही लढविली. शिवेसनेत फूट पडल्यानंतर त्यांच्यातील मूळ शिवसैनिक जागा झाला आणि त्यांनी पुन्हा उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व मान्य करीत शिवसेना (उबाठा) मध्ये प्रवेश घेतला. शिवसेना फुटीनंतर उद्धव ठाकरे यांची २०२३ मध्ये दिग्रस येथे जाहीर सभा झाली. त्यांनतरही त्यांनी अलिकडे जिल्ह्यात तीन सभा घेतल्या. दिग्रस विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे कायम वर्चस्व राहिल्याने येथून शिवसेना (उबाठा)कडून संजय देशमुख हेच लोकसभा आणि भविष्यात विधानसभेचेही उमदेवार राहितील, हे स्पष्ट केले. आज शिवसेना उबाठाने जाहीर केलेल्या उमेदवारांच्या यादीत संजय देशमुख यांचे नाव झकळले आणि गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या महाविकास आघाडीचा उमेदवार नक्की कोण राहणार, या चर्चांना विराम मिळाला.

# नांदेड पतंजलीतर्फे रंगपंचमी उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** रंगपंचमी उत्सवाने जीवनात सकारात्मक ऊर्जा तसेच सुख, समृद्धी, खुशाली वृद्धिंगत होते. या दिवशी एकमेकांवरती गुलाल रंग उधळून व आपसात भेटी घेऊन रंगपंचमीचा उत्सव साजरी करत असतो.

नांदेड पतंजली योग परिवारातर्फे अनिलजी शेटकार यांच्या अनिल लॉन्स, निळा फाटा नांदेड ठिकाणी रंगपंचमी उत्सव साजरी करण्यात आला. विविध कोरडे केमिकल विरहित रंगाचा वापर करून रंगपंचमीच्या आनंद सर्वांनी घेतला. याप्रसंगी होळी गीत,भक्ती गीत, देशभक्ती गीतांच्या गजरात सर्वांनी नृत्य प्रदर्शित केले. अशा उत्सवाने आपसात प्रेम, आपुलकी स्नेह सद्भावना वाढत असते असे अनिल जी शेटकार यांनी मनोगत व्यक्त केले. समितीतर्फे सर्वांना खिचडी-भजेचा अल्पोपहार देण्यात आला.

याप्रसंगी सर्वश्री अनिलजी शेटकार, दत्तात्रयजी काळे, पंढरीनाथजी कंठेवाड, सिताराम सोनटक्के, राम शिवपनोर, सुरेश लंगडापूरे, महारुद्र माळगे, हनुमंत ढगे, ज्ञानेश्वर बोखारे, जगन्नाथ येईलवाड, शिवाजीराव शिंदे हळदेकर, प्रदीप तेललवार, शिवाजी पाटील, सुधाकर पिलगुंडे, गोविंद पेड़गुलवार, भगवानदास बजाज, शिवाजी पेन्शलवार, वसंतराव कल्याणकर, व्यंकट कल्याणपाड, भागवत भातलावंडे, विकास बनगिनवार, अशोक नातेवाड, सुभाष जाधव, दिगंबर शिंदे, कोंडीबा कागने, भागवत मुंडे, सिद्धार्थ



गायकवाड, गणेश संगेवार, गुणवत मंगनाळे, जळबा धरमुरे, शंकर केंद्रे, शिवाजी केंद्रे, विलास पंदीलवार, सतीश कवटीकवार, सुधाकर कामठेकर, प्रल्हाद आयनोले, पंकज आयनोले, राजू शेटे, लक्ष्मीकांत बदनापूरकर, व्यंकटेश कोटगिरे, विजय वाघ, सोपानराव मारकवाड, गजानन कोदुरवार, प्रदीप संगनवार, विलास कौवठेकर, सूर्यकांत पाटील, रमेश बंडेवार, शैलेश पालदेवार, मुंजाजी भोकरकर, बालाजी वारकड, एकनाथ पाटील, सदाशिवराव बुटले, रमेश जयकर, सुधीर देशपांडे, शैलेंद्र नावडे, दिलीप बाष्टेवाड, अरुण घोडसे, रूकमाजी मुदखेड, शिवराज बंडे, सुरेश शेटकार, ज्ञानेश्वर वडमिलवार, सुदर्शन आठवले, नामदेव मोहिते, दामोदर जाधव, साईनाथ लिंगाडे, सुनील गुरु, अच्चूत वायफनकर, प्रकाश गुंडावार, शिवाजी मुलंगे, हनुमंत वाडेवाले, प्रमोद जोशी, लक्ष्मण वरकंठे, भारत टेफाडे, जनार्दन आठवले, दिलीप आघाव, सुनील घोडेकर, शशिकांत चिंताळे, राजकुमार बनगुलवार, मोहन गुरमे, अनिल राठोड, अवधूत जोशी, बाबाराव हंबर्डे, सदाशिव गोणेवाड, गोविंद बिरादार, अनिल कदम, अमोल पत्रे, योगेश ननवरे, बालाजी जाधव, सूर्यकांत राठोड, संभाजी काष्टेवाड, रमेश गोविंदवार, बालाजी पाटील, गंगाधर चव्हाण, दिलीप जयस्वाल, सुधाकर भाले, दिनेश आर्य, संतराम गवते, ईश्वर सुरदुसे, रामराव जनकवाडे, भीमराव कारामुंगे, वेंकटेश बोड्डावर, अशोक संगपनोर, राजवीर कवटीकवार, पुरभाजी हरवडे, माधव पटणे, प्रभाकर डांगे, सुनील पेन्सलवर, उत्तम वट्टमवार, अनिल कोत्तापल्ले, के.एल. जाधव, उत्तम साठे, नंदकिशोर गबाळे, अशोक आगलावे, माधवराव शिंदे, साखरे, कदम एन.टी., बाबू पाटील, साईनाथ असपत, राजू सूर्यवंशी, राजेश भोकरे, भास्कर पोधाडे, प्रकाश गौड, सत्यपाल मंगनाळे, होळसे पाटील, बालाजी मोरे, माधव गंगासागरे, गंगाधर सावळे, गजानन हिंगमीरे, पांडुरंग कोमुलवार, पंडित पाटील, भोसले डी.व्ही., जितेंद्र देशमुख, राजेश पंडाने, बालाजी वारले, मधुकर पाटील, प्रकाश पाटील, लक्ष्मण परडे, हरिहर नरवाडे, सत्यपाल मंगनाळे, किरण अंबुलगे, इरन्ना आउलवार, गणेश वडजे, प्रकाश पल्लेवाड, दीपक शंकरवार, दामोदर जाधव, गणेश शिंबाळे, मुकुंदराव देशमुख, शिवाजी तोर, सुभाष निलावाड, राजू मोरे, राजुलाल यादव, शिवानंद नीटुरे, लक्ष्मण सुपारे, शंकरलाल यादव, प्रवीण जैस्वाल आदी मान्यवर उपस्थित होते असे अनिल अमृतवार यांनी सांगितले.

# दुर्गम भागात मतदान प्रक्रियेत वायरलेस सुविधांचाच आधार

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** मेळघाटसारख्या दुर्गम भागात ५२ मतदान केंद्रांवर इंटरनेटचे नेटवर्क, मोबाइल कनेक्टिविटी नसल्याने तिथे निवडणुकीदरम्यान अडचण जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून त्या ठिकाणी संपर्कासाठी वनविभागाच्या वॉकीटॉकी, मॅनपॅकसारख्या वायरलेस साधनांची व्यवस्था करण्यात येत आहे.

जिल्ह्यात इंटरनेट, मोबाईल नेटवर्क नसलेल्या (शॅडो) एकूण ७२ मतदान केंद्रांची यादी तयार करण्यात आली होती. निवडणुकीच्या अनुषंगाने येथे नेटवर्कची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याची मागणी पत्राद्वारे मेळघाट विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक साहाय्यक अधिकाऱ्यांकडून जिल्हा निवडणूक प्रशासनाकडे करण्यात आली होती. त्याअनुषंगाने बीएसएनएलकडे नेटवर्कची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आले. ७२ पैकी २० मतदान केंद्रांवर नेटवर्क उपलब्ध झाले असून, ५२ केंद्रांवर मात्र अद्याप नेटवर्क उपलब्ध नाही. त्यामुळे निवडणुकीदरम्यान व प्रामुख्याने मतदानाच्या दिवशी जिल्हा प्रशासनाकडे मतदानाचा संपूर्ण अहवाल पाठविताना तांत्रिक अडचणी येऊ शकतात. मेळघाटातील निवडणूक अधिकारी व कर्मचारी यांचा संपर्क जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांसोबत होणेही आवश्यक आहे. त्यामुळे तातडीने काही सूचना, निर्देश देणे शक्य होईल. या सर्व परिस्थितीचा विचार करता ज्या ५२ मतदान केंद्रांवर नेटवर्क उपलब्ध नाही, तिथे वायरलेस साधनांचा जास्तीत जास्त वापर केला जाणार आहे.



खुलताबाद तालुक्यातील मौजे सोबलगाव लघुपाटबंधारे धरण मार्च मधेच कोरडेठाक पडले आहे. गत वर्षी जेमतेम पर्जन्यमान पाऊस राहिल्याने धरणाला पाणी साठाच झाला नव्हता त्यात धरणक्षेत्र व वर उगमस्थानी शेवटच्या टप्प्यात अवकाळी पाऊस तथा ढगफुटी सदृष्य जोरदार पाऊस झाल्याने धरणात पाणी साठा झाला होता.मात्र बाष्पीभवन वारा उन्हाळा बघता व पाणी साठवणीतून पाणी उपसा बघता आजरोजी धरण कोरडाठाक झाला आहे. धरणाची लांबी दोन किमी पर्यंत आहे.तर लाभक्षेत्र ५१८हेक्टर व लागवड ५०८हेक्टर क्षेत्र आहे.सिंचन क्षेत्र ४२९हेक्टर आहे. माळेगांव, हनुमान वाडी दरेगाव पाडळी सोबलगाव डोंगर शिवार क्षेत्रांतून सोबलगाव धरणासाठी पाणी स्त्रोत आहे.मात्र यंदा मार्च मधेच धरण कोरडेठाक पडले आहे. त्यामुळे धरण क्षेत्रा लगत व अवलंबून क्षेत्र पाणी साठा अभावी शेतकरी नागरिक रब्बी व उन्हाळी पिके घेण्यापासून वंचित राहणार असल्याचे चित्र आहे.

## होळी-रंगपंचमीनिमित्त कुलस्वामिनी प्रतिष्ठानतर्फे होळी-रंगपंचमी उत्साहात साजरी !

आधुनिक केसरी न्यूज

**सुधीर कोर्टीकर**

**छत्रपती संभाजीनगर :** २३ मार्च रोजी सायंकाळी होळी पुर्व संध्याकाळी कुलस्वामिनी मंगल कार्यालय येथे होळी रंगपंचमी आयोजित करण्यात आली. जवळपास १५० महिला व मुलीनी या उपक्रमास उपस्थित राहुन आनंद घेतला. सोबतच अल्पोपहार व थंडाई देण्यात आली. सुनंदा लाहोटी, कांचन जैस्वाल, पल्लवी व मंदार कुलकर्णी, माया व किरण कुलकर्णी, रमा नावंदर, सोळुंखे, दिव्या पाटील, स्वाती येडके, सारिका खरात, पल्लवी पाटील, भावना सोनी, शिल्पा भोरे, नितीन खरात, शिवाजी दांडगे, भाकरे योगेश, इत्यादी सर्व उपस्थित होते. चंद्रमुनी जायभाय, प्रलाद गायकवाड, अनिल गावंडे यांनी उपक्रम यशस्वी करण्यास मेहनत घेतली. विविध रंगीत गॉगल, रंगीन कॅप्स सोबत ३/४ सेल्फी व म्युझिक, बँडची व्यवस्था करण्यात आली होती. या उपक्रमास सर्वांना पाणी वाचवा,नैसर्गिक कोरडा रंग खेळण्याविषयी जनजागृती व संदेश देण्यात आला. प्रतिष्ठानचे विलास कोरडे व सौ अलका कोरडे यांनी हा उपक्रम मोफत आयोजित केला होता.

तसेच उपस्थित महिला, मुलींना नैसर्गिक रंगाचे पैकेट मोफत देण्यात आले.



## निवडणुकीवर डोळा ठेवून कांदा निर्यात बंदी कायम : विष्णुपंत भुतेकर यांचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**



**वाशिम :** सरकारने कांदा निर्यातीवर घातलेली बंदी मार्च अखेर नंतर उठवली जाईल अशी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आशा होती. निर्यात बंदी उठल्यास कांद्याच्या भावात वाढ होईल आणि दोन पैसे शिल्लकचे हातात येतील अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. परंतू होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीवर डोळा ठेऊन सरकारने कांदा निर्यात बंदी अनिश्चित काळासाठी कायम ठेवली आहे. शहरी भागातील चाकरमान्यांची मनधरणी करण्यासाठी सरकार कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उध्वस्त करत असल्याचा आरोप भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी केला आहे.

मार्च नंतर कांदा निर्यात बंदि उठवली जाईल आशी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आपेक्षा होती. परंतु सरकारने कांदा निर्यात बंदिची मुदत संपन्या आधीच पुन्हा अनिच्छीत काळा साठी निर्यात बंदिचा निर्णय घेउन टाकलेला आहे.

सरकारने चालु आसलेल्या निवडणूका जिंकण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. देशातील शहरी भागात स्वस्त दरात कांदा उपलब्ध व्हावा म्हणून सरकार आत्याआवशक वस्तु कायद्याचा वापर करून आशा प्रकारचे निर्णय घेत आसते. पंरतु या निर्णयामुळे लाखो कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे संसार उघडयावर येणार आहेत. राज्यात आधीच दुष्काळसदृश परीस्थीती निर्माण झालेली आहे. त्यात सरकार हेतु पुरस्सर शेत मालाचे भाव पाडत आहे. विक्रमी तेल आयात केल्यामुळे सोयाबीन या मुख्य पीकाचे भाव प्रचंड पडलेले आहेत. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मातीमोल भावाने सोयाबीन विकुन संसाराचा गाडा पुढे रेटावा लागत आहे. रोज शेतकरी आत्महत्या होत आसुन देशात साडे तीन लाख शेतकऱ्यांच्या आत्महत्या होवुनही सरकार शेतकऱ्यांशी असंवेदनशील पणे वागत आहे. कापुस, गहु, तेलबिया सह सर्व शेत मालाचे भाव पाडुन सरकार शेतकऱ्यांच्या जिवासी खेळत आसल्याची प्रतीक्रीया भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी दिली आहे.



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर